जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी माळीवाडा वेस पाडावी

## वीरशैव लिंगायत गवळी समाजाचा पाठिंबा

नगर - दीडशे वर्षांपूर्वी क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले या दांपत्यांनी सर्व समाजाला शिक्षणाची द्वारे खुली केली. त्यांच्या कार्याला विरोध करणाऱ्यांनी वेळप्रसंगी शेण व चिखल मारले. तरीदेखील या महापुरुषांनी सर्वांना शिक्षण दिले. महिलांना चूल आणि मुल या सकल्पनेतून बाहेर काढले. शिक्षणाने महिलांना समाजात प्रतिष्ठा प्राप्त झाली. महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक होत असल्याने सर्व समाजाला आनंद होत आहे. माळीवाडा येथे क्रांतीसुर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीआई फुले पूर्णाकृती पुतळा होऊन भव्य दिव्य असे स्मारक व्हावे. ही सर्व समाजाची मागणी आहे. स्मारक भव्य दिव्य होण्यासाठी माळीवाडा वेस पाडण्यात यावी. यासाठी वीरशैव लिंगायत गवळी समाज जाहीर पाठिंबा देत आहे. महात्मा फुले हे सर्व समाजाचे दैवत आहे, असे प्रतिपादन बाळासाहेब मिसाळ यांनी केले आहे.

महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीच्या माळीवाडा वेस पाडावी या ठरावाला वीरशैव लिंगायत गवळी समाज ट्रस्ट ने जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले, प्रा.माणिक विधाते, बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, वीरशैव लिंगायत गवळी समाज अहिल्यानगर चे नगरसेवक प्रकाश भागानगरे, सटवाजी आप्पा गेणाप्पा, पै.सतीश हरबा, विष्णू कलागते, चंद्रकांत औशीकर, आप्पासाहेब बारसे, शंकरराव पंगूडवाले, हरिभाऊ हिरणवाळे, लंकेश हरबा, बाळासाहेब मिसाळ, दत्तात्रय नागापुरे, मोहन हिरणवाळे, राहुल हरबा, राजू घुगरे, अनिल हरबा, सचिन बहिरवाडे, नंदू भागानगरे, जगन्नाथ बहिरवाडे, संभाजी नामदे, नवनाथ खंडेराव, उमेश दहींडे, अरुण औशीकर, सागर हरबा, विशाल भागानगरे, बंडू लंगोटे, सोमनाथ शहापूरकर उपस्थित होते.



महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीच्या माळीवाडा वेस पाडावी या ठरावाला वीरशैव लिंगायत गवळी समाज ट्रस्ट ने जाहीर पाठिंबा दिला आहे. यावेळी महात्मा फुले दांपत्य स्मारक समितीचे किशोर डागवाले, प्रा.माणिक विधाते, बाळासाहेब भुजबळ, विनोद पुंड, नगरसेवक प्रकाश भागानगरे आदी.

यावेळी प्रा.माणिक विधाते म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीआई फुले यांच्या स्मारकासाठी जागा अपुरी पडत असल्याने माळीवाडा वेस पाडण्यात यावी हा ठराव फुले दांपत्य स्मारक समितीने केला आहे. स्मारक पाचही रस्त्यावरून दिसावे. तसेच परिसरातील अतिक्रमणे काढण्यात यावी. रखडलेले स्मारकाचे काम ताबडतोब सुरू करावे या मागणीसाठी महापालिकेत निवेदन देण्यात आले आहे. या मागणीला नगरसेवकांनी पाठिंबा दिला आहे. तसेच शहरातील गणेश मंडळे व अनेक समाजाचा पाठिंबा मिळत असल्याने महात्मा फुले अनुयायांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. गवळी समाजाने पाठिंबा दिला आहे. यावेळी अनिल हरबा यांनी आभार मानले.

# प्रतिक्रिया नव्हे, पुनरावलोकनाची शांत ताकद



राजन कुटे

बाजारात एक वेगळीच घाई असते. आकडे बदलतात, बातम्या येतात, आणि अचानक असं वाटायला लागतं की काहीतरी करायलाच हवं. निर्णय घ्यावा, बदल करावा, काहीतरी हालचाल करावी-ज्यामुळे नियंत्रणात असल्याची भावना निर्माण होते.

पण कालांतराने एक गोष्ट हळूहळू लक्षात येते. प्रत्येक बदलाला प्रतिक्रिया देण्याची गरज नसते. खरं तर, बहुतेक वेळा घाईत दिलेली प्रतिक्रिया अधिक नुकसान करते. कारण प्रतिक्रिया ही स्पष्टतेतून येत नाही. ती अस्वस्थतेतून येते. आणि गुंतवणुकीतली ही अस्वस्थता बहुतेक वेळा तात्पुरती असते.

याच्या विरुद्ध एक शांत मार्ग असतो. कमी दिसणारा, कमी गाजावाजा असलेला-पण अधिक प्रभावी - पुनरावलोकन. पुनरावलोकन घाई करत नाही. प्रत्येक बदलाला महत्त्व देत नाही. ते थांबतं. गुंतवणुकीमागचा मूळ उद्देश तपासतं. दिशा अजूनही योग्य आहे का, हे पाहतं. आणि एक साधा प्रश्न विचारतं-खरंच काही मूलभूत बदल झालाय का? बहुतेक वेळा उत्तर 'नाही' असतं. बाजार बदलतो. पण उद्दिष्टं तिथेच असतात. इथेच पुनरावलोकनाची ताकद दिसते.ते आवाज आणि महत्त्व यामधला फरक स्पष्ट करतं. निर्णयांना पुन्हा एकदा उद्देशाशी जोडतं-भावनांशी नाही. कारण गुंतवणूक ही प्रतिक्रिया देण्याची प्रक्रिया नाही. ती एक पद्धत आहे. ज्यात तपासणी आहे, आवश्यक ते बदल आहेत, आणि काहीही बदललं नसेल तर शांतपणे पुढे जाणं आहे.

हा मार्ग खूप सक्रिय वाटणार नाही. काहीतरी केलं असं समाधान देणार नाही. पण दीर्घकालीन दृष्टीने, तो अधिक मौल्यवान गोष्ट तयार करतो - सातत्य. आणि सातत्यच हळूहळू परिणाम घडवतं.

गुंतवणुकीत स्पष्टता म्हणजे नेहमी काहीतरी करणं नाही - तर कधी काहीच करण्याची गरज नाही, हे समजणं आहे.

शांत ठेवा. स्पष्ट ठेवा.

- **राजन कुटे,**
ॲंफी नोंदणीकृत मुच्यूअल फंड वितरक
मो. ९४०३३७४६७४ /९४२३७०८६७०

## राधाकृष्णजी महाराज व भास्करगिरी महाराजांचे ५ एप्रिल रोजी आगमन



नगर - गुरुदत्त भक्तीधाम, संत किसनगिरीनगर मंदिर येथे ५ एप्रिल रोजी सायंकाळी ६.३० वाजता, सद्गुरु भास्करगिरी महाराज तसेच गोवत्स श्री राधाकृष्णजी महाराज (जोधपूर) यांचे आगमन होणार आहे. या प्रसंगी दोन्ही महात्म्यांच्या दर्शनाचा दुग्धशर्करा योग लाभणार असून, श्री राधाकृष्णजी महाराज यांच्या मधुर वाणीमधून भक्तांना प्रवचनाचा लाभही मिळणार आहे. भक्तांनी संत आणि सद्गुरूंच्या दर्शनासाठी व सत्संगासाठी उपस्थित राहावे, असे आवाहन श्री समर्थ सद्गुरु किसनगिरीबाबा नगर भक्तमंडळ व बन्सी महाराज मिठाईवाले यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी ६ एप्रिलला शक्तिप्रदर्शनाने भाजपचे अक्षय कर्डिले उमेदवारी अर्ज दाखल करणार

## प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार

नगर - राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीसाठी भाजप पक्षाच्या वतीने उमेदवार अक्षय कर्डिले हे ६ एप्रिल रोजी शक्तिप्रदर्शन करत उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. या वेळी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण तसेच पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत हा अर्ज भरला जाणार आहे.

स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर ही पोटनिवडणूक होत असून कार्यकर्त्यांनी एकजुटीने निवडणूक लढवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर राहुरी शहरातील पांडुरंग लॉन्स येथे भव्य विजय सभेचे आयोजन करण्यात आले असून पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन अक्षय कर्डिले यांनी केले आहे.



पोटनिवडणूकीच्या पार्श्वभूमीवर कार्यकर्त्यांशी संवाद साधताना भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले. (छाया : लहू दळवी)

या पार्श्वभूमीवर बुऱ्हानगर येथे नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत बाजार समितीचे सभापती भाऊसाहेब बोठे, उपसभापती रभाती सूळ, बाजीराव गवारे, अशोक झरेकर, संदीप कर्डिले, देविदास कर्डिले, अरुण होळकर, दादाभाऊ चितळकर, शीलाताई खराडे, प्रयागा लोंढे, आनंदराव शेळके यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी बोलताना अक्षय कर्डिले म्हणाले की, माझे वडील स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांनी जनतेशी असलेले नाते कधीही तुटू दिले नाही. त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी अहोरात्र कष्ट घेतले आणि सुखदुःखात सहभागी होत विकासाची कामे केली. केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजना शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवण्याचे काम त्यांनी केले. त्यांचा हा विकासाचा वारसा पुढे नेण्याची जबाबदारी आपली आहे. मतदारसंघाच्या विकासाला गती देण्यासाठी आपण सर्वांनी एकत्रित काम करणे गरजेचे आहे. या निवडणुकीत आपला विजय निश्चित आहे. तुम्ही सर्वांनी माझ्या वडिलांसोबत काम केले आहे, त्यामुळे मला सांभाळून घ्या आणि जनतेची सेवा करण्याची संधी द्या, असे आवाहन त्यांनी पदाधिकाऱ्यांना केले.

# चिचोंडी पाटीलच्या यात्रोत्सवात जुन्या भांडणातून तरुणावर हल्ला

## जखमी झाल्याने जिल्हा रुग्णालयात उपचार सुरु, एकावर गुन्हा दाखल

नगर - नगर तालुक्यातील चिचोंडी पाटील येथे यात्रा उत्सवादरम्यान जुन्या भांडणाची कुरापत काढून एका तरुणावर विटेने जीवघेणा हल्ला केल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात आरोपी घनश्याम संतोष जाधव (रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत आदित्य कैलास पाडेकर (वय २४, रा. चिचोंडी पाटील, ता.नगर) यांनी फिर्याद दिली आहे. आदित्य हे गावातील यात्रेसाठी गेले असता, त्या ठिकाणी आरोपी घनश्याम जाधव हा दारूच्या नशेत आला. त्याने आदित्य यांना जुन्या भांडणाचे कारणावरून अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. आदित्य यांनी शिवीगाळ करण्यास विरोध केला असता, तू मला पाठीमागे शिवीगाळ आणि मारहाण केली होती, असे म्हणून आरोपीने संताप व्यक्त केला.

या रागातून घनश्यामने तेथे पडलेली वीट उचलून आदित्य यांच्या डोक्यात जोरात मारली. या हल्ल्यात आदित्य यांच्या डोक्याला गंभीर दुखापत होऊन रक्तस्राव झाला. तसेच 'तू कोठेही भेट, तुला जिवंत मारून टाकील' अशी धमकीही आरोपीने दिली. या घटनेनंतर जखमी आदित्य यांना उपचारासाठी जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवला असून अधिक तपास महिला पो.ना. गायत्री धनवडे करत आहेत.

# घरात गळफास घेत एकाची आत्महत्या



नवनाथ गोरे

नगर - राहत्या घरात गळफास घेत ४४ वर्षीय व्यक्तीने आत्महत्या केल्याची घटना नगर तालुक्यातील रुईछत्तीसी येथे ३ एप्रिल रोजी सकाळी ९.३० च्या सुमारास उघडकीस आली आहे. बाळासाहेब सुभाष गोरे (वय ४४, रा. रुईछत्तीसी, ता.नगर) असे मयताचे नाव आहे.

बाळासाहेब गोरे यांनी गळफास घेतल्याचे निदर्शनास आल्यावर त्यांना त्यांचे नातेवाईक नवनाथ पंढरीनाथ गोरे यांनी उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. मात्र तेथील मेडिकल ऑफिसर डॉ.तोडमल यांनी उपचारापूर्वीच मयत घोषित केले. याबाबतच्या अहवालावरून नगर तालुका पोलिस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. मयत गोरे यांच्या पश्चात आई, वडील, भाऊ, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी असा परिवार आहे.



जामखेड तालुक्यात वादळी पावसामुळे वीज पडून घराचे झालेले नुकसान, कोसळलेले झाड तर अनेकांच्या घरात घुसलेले पावसाचे पाणी छायाचित्रात दिसत आहे.

## राजेश मैड यांचे अल्प आजाराने निधन



नगर - जुनी कोर्ट गल्ली येथील रहिवासी राजेश माधवराव मैड (जोर्वेकर) (वय ४०) यांचे ४ एप्रिल रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांचे विळद घाट येथील विखे पाटील कॉलेज येथे मरणोत्तर देहदान करण्यात आले.

त्यांच्या मागे १ भाऊ, भावजय, पुतणे असा परिवार आहे. लाड सुवर्णकार पतसंस्थेचे ट्रस्टी सुरेश माधवराव मैड यांचे ते धाकटे बंधू होत.

## श्रीमती शोभाबाई राठोड यांचे हृदयविकाराने निधन



नगर - मिसाळगल्ली सर्जेपूरा येथील रहिवासी श्रीमती शोभाबाई जगदीशचंद्र राठोड (वय ७०) यांचे ३ एप्रिल रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, १ मुलगी, जावई असा परिवार आहे. चितळे रोड येथील जगदीश स्टोअर्सचे गणेश व गोपाल राठोड यांच्या त्या मातोश्री होत.

# अहिल्यानगर जिल्ह्यात दररोज अवकाळी पावसाचा कहर सुरूच

(पान १ वरुन)

## नुकसानीचा प्राथमिक अहवाल शासनास सादर

गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात अवकाळी पाऊस आणि वादळी वाऱ्याचा कहर सुरुच असून, २ एप्रिल रोजी कृषी विभागाने अवकाळी पावसाने झालेल्या रब्बी पिके आणि फळबागांच्या नुकसानीची पाहणी करुन शासनाला प्राथमिक अहवाल पाठविला आहे. या अहवालानुसार अकोले तालुक्यातील ३२ गावे, कोपरगाव तालुक्यातील २४, संगमनेर तालुक्यातील १८, जामखेड तालुक्यातील २०, राहुरी तालुक्यातील १४, पारनेर तालुक्यातील ६ तर राहाता तालुक्यातील ११ गावांना अवकाळीचा फटका बसला आहे.

या पावसाने मका, भाजीपाला, कांदा, गहू, बाजरी, हरभरा, भुईमूग आदी पिकांबरोबरच डाळिंब, केळी, पेरू, द्राक्षे, आंबा आदी फळबागांचे नुकसान झाले आहे. जिल्ह्यात एकूण ४ हजार ७९७.१६ हेक्टर पिकांचे नुकसान झाले असून, यापैकी ४ हजार ७३०.९६ हेक्टर क्षेत्रावरील पिके आणि फळबागांचे ३३ टक्क्यांपेक्षा अधिक नुकसान झाले आहे.

## जामखेड तालुक्यात वीज पडून गायीचा मृत्यू, घराचे नुकसान

जामखेड तालुक्यात गेल्या दोन दिवसांपासून काही ठिकाणी वादळी वाऱ्यासह पाऊस पडत आहे. २ एप्रिल रोजी रात्री झालेल्या पावसामुळे मोहरी येथील शेतकरी सुखदेव नामदेव श्रीरामे यांच्या गायीच्या अंगावर वीज कोसळली यामुळे गायीचा जागीच मृत्यु झाला. तलाठी गागरे यांनी पंचनामा करून तहसील विभागाला अहवाल सादर केला आहे.

२ एप्रिल रोजी रात्री नऊ ते साडेनऊ च्या सुमारास व ३ एप्रिल रोजी पहाटे झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे महारूळी बाळू बाबा मुळे यांच्या घरावर वीज पडली यामुळे घराचे काही प्रमाणात नुकसान झाले आहे. तलाठी अक्षय शिंदे यांनी पंचनामा केला आहे. तसेच राजुरी येथील न्यू इंग्लिश स्कूल मध्ये झाड पत्र्याच्या शेडवर पडून नुकसान झाले.याच रात्री चोंडी येथील गणेश जगदाळे यांच्या केळीच्या बागाचे वादळी वाऱ्यासह पावसामुळे नुकसान झाले. चोभेवाडी येथील बाळू लक्ष्मण वाळुंजकर यांच्या दोन हेक्टर आंबा पिकांचे नुकसान, लक्ष्मण गणपत वाळुंजकर यांच्या एक एकर आंबा पिकांचे नुकसान झाले, चंपाबाई लक्ष्मण वाळुंजकर यांच्या एक एकर आंबा पिकांचे नुकसान झाले आहे. वरील नुकसानीचा पंचनामा तलाठी व ग्रामविकास अधिकारी यांनी केला आहे.

सध्या काही शेतकऱ्यांची गहू, ज्वारी पिकांची काढणी सुरू आहे. तसेच कांदा शेतात आहे. त्याचे भिजून नुकसान झाले. फळपिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले याचबरोबर शहरात झालेल्या पावसामुळे अनेकांच्या दुकानात व घरात पाणी शिरले यामुळे एकच हाहाकार उडाला. तहसीलदार धनंजय बांगर यांनी नुकसान झालेल्या भागांचे पंचनामे करून अहवाल सादर करण्याचे आदेश दिले आहे. तसेच तहसील कार्यालयात आपत्कालीन कक्ष सुरू करण्यात आला आहे.

## दगावलेल्या पशूधनाचे, नुकसानीचे १०० टक्के पंचनामे करा - पालकमंत्री

अवकाळी पाऊस आणि गारपीटीने नुकसान झालेलं शेतीपिक, दगावलेल्या पशूधनाचे आणि अन्य नुकसानीचे शंभर टक्के पंचनामे करण्याच्या सूचना जलसंपदा तथा पालकमत्री ना.राधाकृष्ण विखे पाटील यांनी दिल्या.

जिल्ह्यात अवकाळी पाऊस झाल्याने शेती पीकांच्या तसेच अन्य नुकसानीची माहीती मंत्री विखे पाटील यांनी जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्याकडून जाणून घेतली. पाथरे बुद्रूक येथील गोपालक सोपान घोलप यांच्या गोठ्यावर वादळी वा-याने वीज वाहक तार पडून नऊ गायी दगावल्या होत्या. त्यांच्या निवासस्थानी भेट देवून मंत्री विखे पाटील यांनी दिलासा दिला. तसेच पंचक्रोशीत पावसाने झालेल्या नूकसानीची माहीती घेतली.

प्रांताधिकारी माणिक आहेर, वीज वितरण कंपनीचे अभियंता गाडे, पशुसंवर्धन अधिकारी डॉ. संपत तांबे, बाजार समितीचे उपसभापती आण्णासाहेब कडू, सरपंच उमेश घोलप, संचालक अशोक घोलप, आबासाहेब घोलप, भाऊसाहेब घोलप, आप्पासाहेब दिघे यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. अजूनही काही दिवस अवकाळी पावसाची शक्यता असून, शेतकऱ्यांनी काढून ठेवलेला उत्पादित माल, जनावरे सुरक्षित स्थळी ठेवण्याबाबतचे शक्य तेवढे नियोजन करून नूकसान टाळण्याचे आवाहन मंत्री विखे पाटील यांनी केले आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### ऊसाचा रस आरोग्यदायी परंतु...

उसाचा रस आरोग्यासाठी फायदेशीर मानला जातो, पण उन्हाळा येण्यापूर्वी तो पिण्यास सुरुवात करणे योग्य आहे का? कोणत्या काही महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत? जर तुम्ही चवीसाठी उसाचा रस पीत असाल तर दिवसा थोडासा चाखण्याचा प्रयत्न करा, म्हणजे जेव्हा हवामान खूप गरम असेल. जर तुम्ही या हंगामात उसाचा रस पीत असाल तर त्यात बर्फ घालू नका. यामुळे घसा खवखवेल आणि तुम्ही आजारी पडू शकता. जर तुम्ही उसाचा रस पीत असाल तर त्यात लिंबाचा रस किंवा थोडे आले घालून प्यावे, जेणेकरून तुम्हाला कोणतेही नुकसान होणार नाही. आजकाल, तुम्ही दररोज उसाचा रस पिण्याची सवय लावू नये. एका वेळी १००-२०० मिली पेक्षा जास्त उसाचा रस पिऊ नये.

## पाककला

### सोया चिल्ली

**साहित्य** : सोया चंक्स ८५ ग्रॅम, पाणी ८०० मिलीलीटर, कॉर्न पीठ २ टेबलस्पून, मीठ १/२ टीस्पून, पाणी २ टीस्पून, टोमॅटो १२० ग्रॅम, लसूण २ टेबलस्पून, सुक्या लाल मिरच्या ४, पाणी २ टेबलस्पून, कॉर्न पीठ २ टेबलस्पून, पाणी ४० मिलीलीटर, तेल, पाणी १०० मिलीलीटर, मीठ १/४ टीस्पून

**कृती** : सर्वात आधी एका भांड्यात सोया चंक्स आणि पाणी घाला. १० मिनिटे भिजवा. भिजवल्यानंतर, पाणी काढून टाका आणि सोया चंक्समधील जास्तीचे पाणी काढून टाका. सोया चंक्स एका भांड्यात ठेवा. कॉर्नफ्लोअर, मीठ आणि पाणी घाला. सर्व चंक्स व्यवस्थित मिक्स करा. ब्लेंडरमध्ये टोमॅटो, लसूण, सुक्या लाल मिरच्या आणि पाणी घाला. गुळगुळीत होईपर्यंत मिक्स करा आणि बाजूला ठेवा. आता एका लहान भांड्यात कॉर्नफ्लोअर आणि पाणी घालून गुठळ्या नसलेले बॅटर तयार करा आणि बाजूला ठेवा. एका पॅनमध्ये पुरेसे तेल गरम करा. लेपित सोया चंक्स सोनेरी आणि कुरकुरीत होईपर्यंत तळा. नंतर, ते पेपर टॉवेलवर काढा आणि तेल निथळू द्या. दुसऱ्या पॅनमध्ये तेल गरम करा. मिश्रित मिश्रण घाला आणि २-३ मिनिटे शिजवा. पाणी, मीठ, लाल तिखट आणि काळी मिरी पावडर घाला. ४-५ मिनिटे शिजवा. तळलेले सोया चंक्स आणि तयार मिश्रण घाला. चांगले मिसळा आणि सॉस घट्ट होईपर्यंत १-२ मिनिटे शिजवा. कोथिंबीर घाला आणि ढवळून घ्या. गॅस बंद करा. वरून कोथिंबीरच्या पानांनी सजवा आणि गरमागरम सर्व्ह करा.

## वास्तू

### नकारात्मकता करा दूर

* घराच्या ईशान्य कोपऱ्यात किंवा पूजेच्या ठिकाणी पाण्याचा कलश ठेवणे अत्यंत शुभ मानले जाते. पाणी हे शांततेचे प्रतीक आहे. नवरात्रीत कलशाची स्थापना केल्याने घरातील वातावरणातील तणाव दूर होतो आणि सकारात्मक लहरींचे आगमन होते.

* घर स्वच्छ ठेवणे आणि दररोज संध्याकाळी भीमसेनी कापूर जाळणे हे देखील नकारात्मकता दूर करण्यासाठी प्रभावी ठरते.

## सौंदर्य

* हळद आणि मधाचा लेप लावा मुरुम आणि सूज कमी होईल.

* मुरुमे शांत आणि बरे करण्यासाठी ताज्या कोरफडीचे जेल वापरावे.

## सल्ला

पनीर जर कडक वाटत असेल, तर वापरण्यापूर्वी ५ मिनिटे कोमट पाण्यात ठेवा, ते एकदम कापसासारखे मऊ होईल तसेच पनीर न तळता वापरल्यास ते जास्त ज्यूसी लागते.

**संकलक** : ॲड. सौ. पूजा गुंदेचा

# दैनिक पंचांग

रविवार, दि. ५ एप्रिल २०२६

**संकष्ट चतुर्थी, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, चैत्र कृष्णपक्ष, विशाखा २४।०८, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष** : पैसा खर्च होईल. संतती बरोबर मतभेद किंवा त्यांच्या चिंतेत मन व्यग्र राहील. सामाजिक क्षेत्रात अपयश येणार नाही याकडे लक्ष द्या.

**वृषभ** : नवीन कामाची सुरूवात करण्याला अनुकूल दिवस. मित्रांबरोबर दिवस आनंदात घालवाल. मागील देणी वसुल होतील.

**मिथुन** : विद्यार्थ्यांना आज अभ्यासात रस वाटणार नाही. शेअर्समध्ये गुंतवणूक करू शकाल. आध्यात्मिकतेतून शांती मिळेल.

**कर्क** : मित्र आणि कुटुंबीय यांच्याबरोबर आनंदात दिवस घालवाल. प्रवास, सहली यातूनही आज आनंद मिळवू शकता.

**सिंह** : आध्यात्मिकतेच्या मदतीने विचारातील नकारात्मकता दूर करा. मनाच्या एकाग्रतेमुळे सर्व कामात फायदा होईल.

**कन्या** : स्वकीयांचा वियोग घडू शकतो. कुटुंबातील लोकांशी मतभेद संभवतात. मिळणाऱ्या फायद्यात नुकसान होणार नाही याकडे लक्ष द्या.

**तूळ** : देण्या-घेण्याचे निर्णय विचारपूर्वक घ्या. अपघात व गैरसमज यापासून दूरच राहा. वाहने सावकाश चालवावीत.

**वृश्चिक** : शारीरिकस्वास्थ्य बिघडू शकते. विनाकारण खर्च होईल. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**धनु** : आज अध्यात्माकडे कल राहिल. जुने मित्र व नातेवाईक यांच्या सहवासामुळे दिवस आनंदात व्यतीत होईल. तब्येत सांभाळा.

**मकर** : उतावीळ स्वभावावर नियंत्रण ठेवून कार्ये शांततेत केल्यास आजचा दिवस हा यशदायी ठरेल. उधारी वसुल होईल.

**कुंभ** : हितशत्रुंपासून पिडा संभवते. संततीसौख्य लाभेल. कोर्ट-कचेरी आदी गोष्टींपासून लांब रहा.

**मीन** : आर्थिक व्यवहार करताना अनोळखी व्यक्तीवर विश्वास ठेवू नका. मागील उधारी वसूल होईल.

## शब्दगंध क्र. ७४०२ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ■ | ५ | | ६ |
| ७ | | | | | | ■ | |
| ८ | | ■ | | ■ | ९ | १० | |
| ■ | ■ | ११ | | १२ | ■ | | ■ |
| ■ | १३ | | | | ■ | ■ | १४ |
| १५ | | | ■ | १६ | १७ | १८ | |
| ■ | १९ | | २० | ■ | २१ | | |
| २२ | | ■ | २३ | | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) एकाएकी; अकस्मात; आकस्मिक ५) मुस्लीम पुरुषाचे एक नाव ७) एक भाजी ८) बंदुकीची दारू; मोठा आवाज ९) आश्चर्य ११) जम १३) एक आंबटगोड फळ १५) बेचव; अळणी; पाणचट १६) श्रीमंत; धनवान; सधन १९) उत्तराधिकारी; हक्कदार २१) घराच्या मागची मोकळी जागा २२) अतिशय आनंद; हर्ष २३) विष्णूचा पाचवा अवतार; बुटका माणूस

**उभे शब्द :-** १) आश्चर्य २) पांघरण्याचे एक वस्त्र ३) ख्रिश्चन धर्मप्रचारिका ४) मुस्लिमांची स्मशानभूमी ५) पशू; जनावर ६) कागदावर किंवा वाळूवर रेघा मारून शकुन पाहण्याची विद्या १०) इंद्राचे आयुध ११) माळी; फुलधर; बागकाम करणारा १२) अनवश्य; नसणारा १३) नियम म्हटला की हा आलाच; नियमाला बाधक गोष्ट १४) सवड; उसंत १७) लिंपणे; ओढा घालणे; लेप देणे १८) आठवड्यातील कोणताही दिवस २०) एक अधिक पाव

### शब्दगंध क्र. ७४०१ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| व्य | व | स्था | प | क | ■ | खं | त |
| व | ■ | प | रा | व | लं | बी | ■ |
| सा | म | ना | ■ | ■ | का | र | ण |
| य | व | ■ | अ | मा | प | ■ | ■ |
| ■ | स | मा | न | ■ | ती | न | दा |
| चो | र | ■ | व | ट | ■ | मा | वा |
| प | ■ | वा | र | स | ■ | ज | न |
| डी | र | ■ | त | र | ल | ■ | ल |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

**सुविचार** : जिद्दीने जगण्याला सुरुवात केली की फुलण्याची संधी नक्की मिळते.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### बहुगुणी ॲस्पिरिनचा शोध कसा व कोणी लावला?

बायर फार्मास्युटिकल कंपनीत काम करणारा फेलिक्स हॉफमन ! त्याने कामाला सुरुवात केली. जुनी रेकॉर्ड तपासल्यावर त्याच्या लक्षात आलं की वेदनेवर आधी सॅलिसिलीक ॲसिड हे एकच औषध उपलब्ध होतं. त्यामुळे वेदना थांबायच्या पण पोटाचे त्रास वाढायचे. नंतर एका संशोधकाने सॅलिसिलीक ॲसिड ऐवजी सोडियम आणि ॲसिटिल क्लोराइडचे संयुग वापरून बघीतले.पण या प्रयोगाची फारशी दखल घेतली गेली नाही. फेलिक्स हॉफमन एक पाऊल पुढे गेला आणि त्याने ॲसेटिक ॲसिड आणि सॅलिसिलीक ॲसिडचे नवे संयुग बनवले. पण तो शास्त्रज्ञ म्हणून काम करत होता बायर कंपनीसाठी त्यामुळे पेटंट कंपनीच्या नावानेच घेतले गेले आणि बायरने 'ॲस्पिरिन' या नावाने ब्रँडचा ट्रेडमार्क नोंदवला.

ॲस्पिरिन हेच नाव घेण्यामागे पण एक कथा आहे ती अशी : ॲसिटिल क्लोराइडचा, सॅलिसिलीक ॲसिड ज्या वनस्पतीतून मिळायचे त्या 'स्पिरिआ अल्मारिआ' या वनस्पतीचा spir आणि ineãX सगळ्याच औषधात असतो. या तिन्हीचे एकत्रीकरण करून नाव झाले ॲस्पिरिन ! पुढची ७ वर्षे बायर कंपनीला मोनोपली मिळाली आणि कंपनी पैसे छापत राहिली.

नंतरच्या काळात वान्स नावाच्या संशोधकाने ॲस्पिरिनवर केलेल्या काही संशोधनासाठी त्याला नोबेल मिळाले. डॉ. लॉरेन्स क्रेव्ह या संशोधकाने हे सिध्द केले की ॲस्पिरिन नियमित घेतल्याने रक्त पातळ होते आणि अचानक येणारा हृदयविकाराचा झटका टळतो. त्यामुळे हृदयरोग असलेल्या सर्व रुग्णांना आजही नियमित ॲस्पिरिन दिले जाते.

### चांगले विचार

अनेक वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक व्यापारी वाईट सवयींचा बळी होता. त्याला त्यापासून मुक्त व्हायचे होते, परंतु त्याने उत्तम प्रयत्न करूनही तो ते करू शकला नाही.

मग कोणीतरी त्याला एका संतांबद्दल सांगितले. तो लगेच त्याच्याकडे गेला आणि त्याला स्वतःबद्दल सर्व काही सांगितले आणि विचारले, मी माझ्या वाईट सवयी कशा सोडू शकतो? पण संताने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. व्यापारी देखील दृढनिश्चयी होता. तो दररोज संतांकडे येऊन विचारत राहिला. संताने त्याला अनेक दिवस थांबविले.

एके दिवशी, जेव्हा तो हट्टी झाला, तेव्हा संत म्हणाला, मी तुला कोणता मार्ग दाखवू? तुझे आयुष्य चाळीस दिवसांपेक्षा जास्त नाही. इतक्या कमी वेळात तू कसा सुधारशील?

हे ऐकून व्यापारी तणावग्रस्त झाला. पुढील चाळीस दिवस तो दुःखात आणि प्रार्थनेत बुडाला. चाळीस दिवस संपायला एक दिवस शिल्लक असताना, संत यांनी त्याला बोलावून विचारले, या एकोणचाळीस दिवसांत तुम्ही किती वेळा वाईट कृत्ये केली?

व्यापाऱ्याने म्हटले, हे आश्चर्यकारक आहे की या सर्व दिवसांत एकदाही माझ्या मनात चुकीचा विचार आला नाही. प्रत्येक क्षणी मृत्यूची भीती कायम राहिली. मग संतांनी त्यांना समजावून सांगितले, वाईटापासून दूर राहण्याचा एकमेव मार्ग म्हणजे प्रत्येक क्षणी मृत्यूचे स्मरण करणे आणि आत्म्याला शांती देणारी कामे करणे. व्यापाऱ्याने संताची सुधारणेची पद्धत समजून घेतली आणि कृतज्ञता व्यक्त करून पापरहित जीवन जगण्याचा संकल्प केला.

तात्पर्य : मानवी जीवन क्षणभंगुर आहे, म्हणून नेहमी चांगले विचार करा आणि चांगली कृत्ये करा.

## जीवन का अमृत (भाग १)



जो कि इस समय जारी है, तो आत्मा अपने स्रोत से ब्रह्मांडीय शक्ति को सीधे प्राप्त कर सकती है

मुझे आपके प्रिय भाई की, एक वायुयान दुर्घटना में हुई मृत्यु पर खेद हुआ। जीवन की मुख्य घटनाएँ पहले से ही निर्धारित होती हैं आपके पूरे परिवार को हुई इस भारी क्षति पर आपको गहरा सदमा पहुँचना स्वाभाविक है । आप

### प्रभू की दया

कृपया करके निश्चित रहें, नामलेवा के रक्त संबंधियों और नजदीकी रिश्तेदारों को परलोक में हर संभव संरक्षण और सहायता दी जाती है। आप इस वजह से उदासी की भावना को बढ़ावा न दें, क्योंकि ऐसी प्रवृत्ति से न केवल आपकी आध्यात्मिक उन्नति पर असर पड़ेगा, बल्कि दिवंगत आत्मा को भी परेशानी होगी ।

१०. जैसे ही एक इंसान अपनी सुरत को समेटकर मन के निवास स्थान पर अपना ध्यान टिकाता है, तो वह प्रभु की दया को जागृत करता है, जो कि उसे ऐसी शक्ति और धैर्य से भर देती है, जैसी उसने पहले कभी अनुभव न की हो। इनसे वह किसी भी प्रकार की कठिनाई का हल ढूँढ सकता है

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

शिवानीदीदी :

तुम्ही तुमच्यासाठी जी नकारात्मक ऊर्जा निर्माण करता त्यापासून तुमचं संरक्षण कोण करेल? तुमच्या विचारांचा पहिला परिणाम तुमच्या मानसिक स्वास्थ्यावर होईल. दुसरा तुमच्या शरीरावर होईल. ह्यापैकी कशातूनही तुम्हाला कोणीच वाचवू शकत नाही. म्हणूनच तुम्ही जो सुविचार मांडलात तो खूपच सुंदर आहे. ङ्कस्वतःशी संवाद साधताना काळजी घ्या. कारण तुम्ही स्वतः तो ऐकत आहात.

### नाते म्हणजे दोन आत्म्यांतील संपर्क

सुरेश ओबेरॉय :

ह्याचा अर्थ आपण स्वत:वर प्रेम करायला हवं?

शिवानीदीदी : आपण इतरांबद्दल कसाही विचार करत असलो तरीही त्यांच्याशी बोलताना आपण प्रेमानेच बोलतो कारण आपल्याला त्यांना दुखवायचं नसतं. पण आपण त्यांच्याबद्दल नकारात्मक विचार करून स्वतःला इजा करून घेतो कारण आपण केलेला नकारात्मक विचार आपण ऐकत असतो. आपण काय बोलतो ते इतर ऐकतात पण आपण काय विचार करतो ते फक्त आपणच ऐकतो.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

मुलगा : बाबा, आई कुठे गेली आहे??? वडील : ईश्वरीय रचना फेरफार केंद्रात.

मुलगा : सत्संगाशी संबंधित विषय आहे का हा?

वडील : नाही, ब्युटीपार्लर ला गेली आहे रे बेटा

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* भारतात सर्वाधिक इंटरनेट वापरण्यात प्रथम स्थानी कोणते राज्य आहे?

– केरळ

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## साहित्य सहवास – 'प्रश्न आणि विश्वास...'

तुला एक प्रश्न विचारु का? – माझ्या मित्राने मला विचारलं. मी त्याला थांबण्यास सांगितले. हा मित्र, अनेकांकडुन पैसे उसने घेतो आणि सदर उसने घेतलेले पैसे लवकर परत देत नाही, हे मला माहित झालं होतं म्हणून त्याला थांबण्यास सांगितलं. मी विचार केला ह्या माझ्याकडुन पैसे उसने पाहिजे असतील. तरीसुध्दा उत्सुकतेपोटी मी म्हणालो विचार प्रश्न. त्याने विचारलं- पुस्तकांचं वाचन करावं मला मनापासून वाटतं. मी नेमकं काय करु? त्याचा हा प्रश्न ऐकुन मला आनंद झाला. माझ्या अनुभव, अभ्यासानुसार त्याला सांगितलं की सर्वात आधी एक पुस्तक भलेही ते पुस्तक पन्नास, शंभर रुपयांचं असेल, ते विकत घे. वाचायला सुरुवात कर. तुझा पुढच्या महिन्यात वाढदिवस आहे, मी तुला एक पुस्तक वाढदिवसानिमित्त भेट देईल. त्याने माझे आभार मानले. त्याच दिवशी त्याने नव्वद रुपयांचे एक पुस्तक विकत घेतले. मला भेटुन कोणते पुस्तक विकत घेतले. दाखवले. म्हणाला अकरा पानं वाचली सुध्दा.

खूपच चांगले आहे पुस्तक. – घटना अगदी साधी, सरळ आहे. प्रश्न हा आपल्या मानवी जीवनातला म्हणजे अगदी दैनंदिन जीवनातला अविभाज्य भाग आहे. समजा एखादा प्रश्न घरातल्या सदस्याने विचारला तर त्याला मी किती विश्वासाने उत्तर देतो हेसुध्दा तेवढंच महत्वाचं आहे. ह्या विश्वासामुळेच तो सदस्य पुढचा प्रश्न विचारणार. एप्रिल महिना म्हंटलं की शाळेची वार्षिक परिक्षा चालु असते. ज्या विद्यार्थ्यांचा अभ्यास चांगल्यापैकी झाला आहे ते आत्मविश्वासाने परिक्षेला सामोरे जातात, उत्तरं लिहितात. परिक्षेसाठी वर्गात जातांना प्रश्नांचा विचार मनात असतोच नेमके कोणते प्रश्न असतील हा विचार रुंजी घालत असतोच. नेमका एखाद्या प्रश्नाचं उत्तर वाचलेलं नसतं अथवा तो प्रश्न, त्याचं उत्तर अवघड म्हणून दुर्लक्ष केलेलं असतं आणि तोच प्रश्न प्रश्नपत्रिकेत असेल तर, सदर विद्यार्थी घाबरणं अगदी स्वाभाविक आहे. अशावेळी विश्वास गमवायचा नाही. स्वतःच स्वतःचा आधार व्हायचं आणि इतर प्रश्नांची उत्तरं विश्वासाने लिहायची. एका प्रश्नाचं उत्तर लिहिलं नाही तर फार फरक पडणार नाही कारण इतर प्रश्नही तेवढेच महत्वाचे असतात. खरं तर आपल्या दैनंदिन जीवनात प्रश्न जेवढे महत्वाचे आहेत तेवढाच महत्वाचा आहे विश्वास. हा विश्वास आहे स्वतःवरचा आणि इतरांवरचासुध्दा.

एकमेकांवर विश्वास असणं ही फार मोठी ताकद आहे. एखादी अत्यंत महत्वाची घटना, आपण, आपल्या मित्राला अथवा मैत्रिणीला सांगतो कारण आपल्या त्याच्यावर अथवा तिच्यावर असणारा विश्वास. ह्याच एकमेकांवर असणाऱ्या विश्वासामुळे अनेक अवघड प्रश्न सोडवले जातात, सुटतात. प्रत्येकवेळी एखादा प्रश्न आपल्यासमोर निर्माण झाला म्हणजे तो प्रश्न प्रत्येकवेळी संकट असेलच असं नाही. त्या प्रश्नाच्या उत्तरात बरचसं दडलेलं असतं हे, त्या प्रश्नाचं उत्तर शोधतांना अथवा त्या प्रश्नावर मनन, चिंतन केलं की आपल्या लक्षात येईल. त्या प्रश्नाचं उत्तरं शोधण्यामुळं आपलीच, आपल्याला नव्याने ओळख होईल अथवा आपल्यातलं सामर्थ्य लक्षात येईल. एवढंच नाही तर आपला उत्तरं शोधण्यावरील विश्वास अधिक दृढ होईल. घाबरुन प्रश्न सुटत नाही पण त्या प्रश्नाच्या उत्तरासाठी विश्वासाने पाऊल उचललं तर नक्कीच आपल्याला उत्तर मिळेल, असंही होऊ शकतं. एका वाचकाचा मध्यंतरी मला फोन आला होता. साहित्य सहवासमधील लेख, लघुकथा नेहमी वाचतो. आवडतात असं तो म्हणाला. संभाषणाचा समारोप करतांना त्या वाचकाने मला प्रश्न विचारला की साहित्य सहवासच्या लिहिण्यामुळं तुम्हाला नेमकं काय मिळतं? मी उत्तर दिलं की मला विश्वास मिळतो की अधिकाधिक लिहिलंच पाहिजे. दैनंदिन जीवनातला एखादा प्रश्न आपल्याला अंतर्बाह्य बदलवु शकतो कारण त्या प्रश्नाचं उत्तर आपल्या उज्वल भविष्यासाठी खुपच महत्वाचं असतं. म्हणून प्रश्नांना न घाबरता, उत्तरासाठी त्या प्रश्नाला सामोरं जाणं महत्वाचं असतं. हे सामोरं जाणंच आपल्यात जिद्द निर्माण करतं, विश्वास मजबुत करतो. एखाद्याच्या विश्वासाला आपण पात्र आहोत हा अत्यानंद होऊ शकतो. कुणीही, कुणावर सहजासहजी, विश्वास ठेवत नाही. त्या विश्वासाला तडा जाणार नाही ह्याची काळजी आपण घेणं विश्वासाइतकंच महत्वाचं आहे. त्या विश्वासाला तडा गेला की नातं नष्ट व्हायला फारसा वेळ लागत नाही. शिवाय ह्या प्रकारातुन अनेक प्रश्न निर्माण होऊ शकतात. प्रश्न निर्माण होऊ द्यायचे नसतील तर एकमेकांवरील विश्वासाचं जतन करणं आपल्याच हातात आहे. प्रश्नांची उत्तरं विश्वासाने शोधुया.

(लेख क्र.५९५)

**– सुनील राऊत**
माळीगल्ली, भिंगार, अहिल्यानगर
मो.९८२२७५८३८३

## आहारवेद – आरोग्य संवर्धन

### सफरचंद

आरोग्याच्या दृष्टीने सर्व फळांमध्ये अति उत्तम म्हणून सफरचंद हे गणले जाते. मधुर, आंबट चवीचे सफरचंद हे बऱ्याच अंशी पूर्णान्न असल्याने आरोग्यसंरक्षक फळ मानले गेले आहे. म्हणूनच 'रोज एक सफरचंद खा आणि डॉक्टरला दूर ठेवा' हे बोधवाक्य सफरचंदाची महती विशद करते.

सफरचंदाला मराठीत 'सफरचंद', हिंदीमध्ये 'सेब', संस्कृतमध्ये 'सेवम'/'काश्मीरफलम्', इंग्रजीमध्ये 'ॲपल' आणि शास्त्रीय भाषेत 'मॅलस डोमेस्टिका' म्हणतात.

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बंगलो सोसायटीमध्ये रिडेव्हलपमेंट : कायदेशीर चौकट आणि वास्तव

आज महाराष्ट्रातील अनेक जुन्या बंगलो सोसायट्यांमध्ये रिडेव्हलपमेंटचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. विशेषतः ज्या सोसायट्यांमध्ये सभासदांना ९९९ वर्षांच्या लीजवर प्लॉट देऊन त्यावर स्वतंत्र बंगले उभारलेले आहेत, तेथे रिडेव्हलपमेंटविषयी कायदेशीर व व्यावहारिक मतभेद निर्माण होताना दिसतात.

काही सभासदांना जुने बंगले पाडून दोन किंवा अधिक प्लॉट एकत्र करून नवीन बहुमजली इमारत उभारायची इच्छा असते, तर काही सभासद अशा रिडेव्हलपमेंटला ठाम विरोध करतात.

**या पार्श्वभूमीवर अनेक प्रश्न उपस्थित होतात** – सोसायटीचे उपविधी महत्त्वाचे की उपलब्ध एफएसआय?., सर्व सभासदांची संमती आवश्यक आहे का?., नवीन इमारतीची स्वतंत्र सोसायटी स्थापन करता येते का?

**जमीन आणि बांधकाम : मालकी कोणाची?**

भारतीय कायद्यात जमीन आणि त्यावर उभारलेल्या बांधकामाची मालकी वेगवेगळी असू शकते, ही संकल्पना मान्य आहे.

**बंगलो सोसायटीच्या बाबतीत –**

✻ जमीन ही Parent / Land Owning Society च्या मालकीची असते

✻ सभासदाला लीजवर दिलेल्या प्लॉटवर उभारलेला बंगला हा त्या सभासदाच्या मालकीचा असतो

९९ वर्षांची लीज ही जरी दीर्घकालीन असली, तरी कायदेशीरदृष्ट्या सभासद जमिनीचा मालक ठरत नाही, तर तो लीजधारक असतो. त्यामुळे जमिनीच्या वापरासंदर्भात अंतिम नियंत्रण जमीनमालक सोसायटीकडेच राहते.

**एफएसआय उपलब्ध आहे म्हणजे पूर्ण वापर करता येतो का?**

अनेकदा असा गैरसमज होतो की नियोजन प्राधिकरणाकडून जास्त एफएसआय उपलब्ध असल्यास तो पूर्ण वापरणे हा सभासदाचा अधिकार आहे. प्रत्यक्षात –

✻ एफएसआय ही कमाल परवानगी असते

✻ त्याचा वापर सोसायटीचे उपविधी, लीज कराराच्या अटी आणि जनरल बॉडीचे ठराव यांवर अवलंबून असतो

✻ सभासद एकतर्फीपणे उपविधींच्या पलीकडे जाऊन बांधकाम करू शकत नाही.

म्हणजेच, सोसायटीने जर विशिष्ट उंची किंवा बांधकाम मर्यादा ठरवलेल्या असतील, तर उपलब्ध एफएसआय असूनही त्याचा पूर्ण वापर करण्याची सक्ती सोसायटीवर करता येत नाही.

**रिडेव्हलपमेंट कधी कायदेशीर ठरते?**

बंगलो सोसायटीमध्ये रिडेव्हलपमेंट तेव्हाच कायदेशीररित्या शक्य होते, जेव्हा –

✻ सोसायटीच्या जनरल बॉडीमध्ये आवश्यक बहुमताने ठराव मंजूर होतो

✻ दोन किंवा अधिक प्लॉट एकत्र करण्यास परवानगी दिली जाते

✻ उपविधींमध्ये आवश्यक बदल करून ते सहकार निबंधकाकडून मंजूर करून घेतले जातात

✻ लीज कराराच्या अटींचे उल्लंघन होत नाही

या प्रक्रिया पूर्ण न झाल्यास केलेले बांधकाम भविष्यात कायदेशीर अडचणींमध्ये सापडू शकते.

**नवीन इमारतीची स्वतंत्र सोसायटी होऊ शकते का?**

सहकार कायद्यातील विद्यमान तरतुदीनुसार, रिडेव्हलपमेंटमधून उभ्या राहिलेल्या इमारतीची स्वतंत्र सोसायटी / अपार्टमेंट संस्था स्थापन करता येते. मात्र

✻ अशी संस्था Parent Bungalow Society ची सभासद असते

✻ मतदानाचा अधिकार एक प्लॉट – एक मत या तत्त्वावर आधारित राहतो

✻ वैयक्तिक फ्लॅटधारक थेट Parent Society चे सभासद होत नाहीत

यामुळे जमीनमालकी आणि निर्णयप्रक्रियेतील समतोल राखला जातो.

**बदलती जीवनशैली आणि सामाजिक वास्तव**

आज अनेक बंगलो मालक वयोवृद्ध झालेले आहेत, कुटुंबातील पुढची पिढी परदेशात स्थायिक आहे, आणि मोठ्या बंगल्याची देखभाल करणे अनेकांना अवघड झाले आहे.

अशा परिस्थितीत रिडेव्हलपमेंटमुळे –

✻ आर्थिक स्थैर्य मिळते

✻ देखभाल सुलभ व सुरक्षित निवास उपलब्ध होतो

✻ आधुनिक सुविधा मिळतात

तरीही, काही सभासदांसाठी बंगला ही केवळ मालमत्ता नसून भावनिक जडणघडण असते. त्यामुळे अशा निर्णयांमध्ये कायद्याची चौकट आणि मानवी दृष्टिकोन यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक ठरते.

**निष्कर्ष –**

बंगलो सोसायटीमधील रिडेव्हलपमेंट हा केवळ बांधकामाचा प्रश्न नसून मालकी हक्क, सहकार कायदा, उपविधी आणि परस्पर समजूतदारपणा यांचा विषय आहे. कोणताही निर्णय घेताना कायद्याच्या चौकटीत राहून सर्व घटकांचा विचार करणेच दीर्घकालीन शांततेसाठी उपयुक्त ठरते.



**– ॲड. रिद्धी पी. बोथरा,**
(हायकोर्ट, औरंगाबाद)

# प्रेरणादायी अक्षरधन

## वेदान्त जाहला स्वदेशी

“मुसाफिर” वाचनीय मननीय प्रेरणादायी अक्षर धन
संकलनः दिशान फिचर्स

समाज मनाला सुखावणारी चैतन्य पालवी
डॉ. रामचंद्र देखणे
'चपराक' प्रकाशित ललित चिंतन

वैयक्तिक आणि सामुदायिक जीवन उन्नत करणे हे ब्रह्मविद्येचे किंवा वेदान्ताचे ध्येय होय. जीवनापासून दूर जाण्यासाठी वेदान्त अवतीर्ण झाला नाही परंतु मध्यंतरीच्या काळात हा वेदान्त परदेशी झाला होता. संत एकनाथ महाराज म्हणतात, 'परदेशी जाहला होता वेदान्त ।' उपनिषदातील ब्रह्मविद्या म्हणजे वेदान्त हा फक्त त्रैवर्णिकांनाच उपलब्ध असे. त्यामुळे बहुजन समाजाला हा वेदान्त पोथ्या–पुराणे आणि ग्रंथांमध्ये बंदिस्त होऊन परदेशी झाला होता आणि दुसरीकडे वेदान्त आणि व्यवहार यात फारकत होऊनही तो परदेशी झाला होता.

ज्ञानदेवांनी परदेशी झालेला वेदान्त पुन्हा देशी केला आणि वेदान्ताचा तसेच कैवल्याचा अधिकार सर्वांना आहे हे ठामपणे सांगितले. एक सामान्य कष्टकरी ज्ञानदेवांकडे येतो आणि सांगतो, 'मला ग्रंथ वाचता येत नाही. मला ज्ञान समजत नाही. भक्तिपासून मी दूर आहे. तरीही मला कैवल्य हवे आहे.' माउली त्याला असे म्हणाले नाहीत की 'अरे तुला काहीच येत नाही. मग कैवल्य कसे मिळणार?' ज्ञानदेव म्हणतात,

म्हणोनि स्वधर्मे निष्कामता । अनुसरले पार्था ।
तेथ कैवल्यपद तत्वता । पातले जगी ।।

कष्ट करतोस, श्रम करतोस, त्या श्रमालाच देव समज. तुझ्या कर्मातच कैवल्य उभे राहील. सम असणाऱ्या या भगवंताची भक्ती जेव्हा मानवी समतेच्या व निरपेक्ष सेवेच्या रूपाने प्रकट होते तेव्हा वेदांत स्वदेशी होतो. ज्ञानदेवांच्या लेखी विद्वान, पंडित, शास्त्री, तत्त्वज्ञ यांच्याइतकाच बहुजन कष्टकरी समाजही कैवल्याचा अधिकारी म्हणून उभा राहतो. म्हणूनच सामान्यांच्या बोलीभाषेत त्यांच्या नित्याच्या व्यवहारातील कृषी, मोट, पाणी, झाडे, शिवार, शेतकरी, कष्टकरी, वने, अरण्ये, बैल, औजारे यासारख्या प्रतिमा वापरून त्यांनी ज्ञानभक्तिचा उपदेश करीत त्यांच्याही जीवनात शुद्ध कर्मयोगाचे प्रबोधन घडविले आहे.

परंपरागत कर्मकांडातील आणि लौकिक व्यवहारातील जडत्व त्यांना घालवायचे होते. त्यासाठी त्यांनी लोकाभिमुख होऊन, जनलोकात वावरून बहुजन समाजाच्या अंतरंगात आणि बाह्याचारात नवचैतन्यसाठी प्रयत्न केला. भक्तिपंथाचा उदय आणि विस्तार, देशभाषेची प्रतिष्ठा आणि त्याच्या अनुषंगाने लोकजीवनाच्या पृथगात्मतेची जाणीव या तीन संकल्पना स्वीकारून ज्ञानदेवांनी शास्त्रप्रामाण्याची चौकट काहीशी शिथिल केली. पुरुषार्थप्रधान विवेकप्रामाण्याची बैठक दृढ केली. जनसमूहाच्या सामाजिक अभिसरणाठीच भक्तिपीठावर एकत्र आणले. समतेची पताका खांद्यावर घेतली आणि ज्ञानदेवांच्या नेतृत्वाखाली ही एकात्मतेची दिंडी निघाली. ही दिंडी महाराष्ट्राच्या लोकजीवनाचे सांस्कृतिक वैभव ठरली.

**– किशोर गांधी**

# सीए अहिल्यानगर शाखा व जैन ओसवाल युवक संघातर्फे 'एमएसएमई व स्टार्टअप' वर चर्चासत्र उत्साहात

नगर – इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंटस् ऑफ इंडिया अहिल्यानगर शाखा व जैन ओसवाल युवक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने 'एमएसएमई व स्टार्टअप' चे फायदे व केंद्र व राज्य सरकार कडून मिळणाऱ्या विविध सबसिडी या विषयावर चर्चासत्र उत्साहात झाले.

अहिल्यानगर येथे आयोजित या कार्यक्रमाला उद्योजक, तरुण व्यावसायिक तसेच विद्यार्थ्यांचा प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नरेंद्र फिरोदिया हे प्रमुख म्हणून उपस्थित होते

प्रमुख वक्त्यांनी सीए पंकज दारा, सीए अनुज चांडक, अशोक बेनके या प्रमुख वक्त्यांनी चढ्ढए क्षेत्रातील संधी, शासकीय योजना, आर्थिक व्यवस्थापन तसेच स्टार्टअप सुरू करताना आवश्यक असणाऱ्या बाबींवर सविस्तर मार्गदर्शन केले. या चर्चासत्रात स्टार्टअप उभारणीतील अडचणी, भांडवल उभारणी, मार्केटिंग धोरणे आणि नवउद्योजकांसाठी उपलब्ध सहाय्य यावर चर्चा करण्यात आली.



कार्यक्रमाचे प्रास्ताविक अहिल्यानगर शाखेचे अध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी केले, अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे तरुणांमध्ये उद्योजकतेची जाणीव वाढून नवीन व्यवसाय संधी निर्माण होण्यास मदत होईल, असा विश्वास सीए अभयकुमार कटारिया यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष नरेंद्र फिरोदिया यांनी आपल्या मार्गदर्शनात एमएसएमई व स्टार्टअप क्षेत्रातील वाढत्या संधी, नवउद्योजकांनी घ्यावयाची काळजी तसेच व्यवसायातील सातत्य, आणि नवोपक्रमाचे महत्त्व यावर प्रकाश टाकला.

जैन ओसवाल युवक संघाचे भूषण भंडारी यांनी मार्गदर्शनात एमएसएमई व स्टार्टअप क्षेत्रातील वाढत्या संधी, नवउद्योजकांनी व्यवसायात संयम बाळगणे, तसेच युवक संघाचा उद्देश केवळ कार्यक्रम आयोजित करणे नसून, समाजातील प्रत्येक तरुणाला एकत्र आणणे, त्यांच्यात नेतृत्वगुण विकसित करणे आणि समाजासाठी काहीतरी सकारात्मक करण्याची प्रेरणा देणे हा आहे.

सूत्रसंचालन सीए सुनंदा रच्चा यांनी केले, तर आभार प्रदर्शन सचिव सीए महेश भळगट यांनी केले. यावेळी अहिल्यानगर सीए शाखेचे उपाध्यक्ष सीए महेश तिवारी, माजी अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक, सीए मोहन बरमेचा, सीए सानित मुथा आणि जैन ओसवाल युवक संघाचे सभासद उपस्थित होते. तसेच हा कार्यक्रम यशस्वी पार पाडण्यासाठी अहिल्यानगर सीए शाखेचे कमिटी सदस्य, जैन ओसवाल युवक संघाचे भूषण भंडारी, सीए संकेत पोखरणा आणि जैन ओसवाल युवक संघाचे सभासद यांनी परिश्रम घेतले.

# 'हिंद सेवा मंडळ' ही सर्वसामान्य विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सदैव तत्पर असणारी 'संस्था'

**सुमतीलाल कोठारी यांचे प्रतिपादन**

नगर – हिंद सेवा मंडळ हे शंभराहून अधिक वर्ष शिक्षण क्षेत्रात कार्यरत असून सर्वसामान्य विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी सदैव तत्पर असणारी संस्था आहे. बालवाडी पासून पोस्ट ग्रॅज्युएशन पर्यंत विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची व्यवस्था करताना, विद्यार्थिनींच्या मोफत शिक्षणासोबत सर्व शासकीय, शैक्षणिक फायदे विद्यार्थ्यांपर्यंत १००% पोहोचविणारी आपली संस्था आहे. संस्थेच्या माध्यमातून येत्या शैक्षणिक वर्षात मोठे विद्यार्थी प्रिय बदल घडविण्यात येणार असून शिक्षणाक्षेत्रात समाज प्रिय शैक्षणिक उपक्रम राबविण्याचा मानस आहे असे सुमतीलाल कोठारी यांनी सांगितले.



हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी नुकतीच नव्याने निवड झाल्याबद्दल सीताराम सारडा विद्यालयाच्या वतीने सुमतीलाल कोठारी यांचा सत्कार करण्यात आला.

हिंद सेवा मंडळाच्या कार्याध्यक्षपदी नुकतीच नव्याने निवड झाल्याबद्दल सीताराम सारडा विद्यालयाच्या वतीने सुमतीलाल कोठारी यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी हिंद सेवा मंडळाच्या उपकार्य अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल ज्योतीताई कुलकर्णी यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी आपल्या मनोगतात हिंद सेवा मंडळाच्या सर्व सदस्यांसोबत राहून शिक्षण क्षेत्रात चांगले काम करण्याची संधी मिळाली असून त्या संधीचे नक्कीच आम्ही सोने करू असे सांगतानाच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगती सोबत त्यांचा सर्वांगीण विकास कसा होईल यासाठी संस्थेच्या माध्यमातून कला – क्रीडा, व्यवसायाभिमुख शिक्षण याकडे विशेष लक्ष देऊन अभ्यासासोबत विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास साधण्यासाठी आम्ही प्रयत्नशील असणार आहोत असे सांगितले .

सीताराम सारडा विद्यालयाचे चेअरमन अजित बोरा यांनी कोठारी हे नक्कीच संस्थेच्या दृष्टीने अत्यंत प्रभावी काम करतील याची आम्हास खात्री आहे असे सांगतानाच शहरातील शिक्षण क्षेत्रात सर्वांना सोबत घेऊन जाण्याची क्षमता असणारे नेतृत्व सुमती लालची आहेत असे सांगितले. ज्योती कुलकर्णी यांना शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष काम करण्याचा मोठा अनुभव असून विविध संस्थांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी त्या नक्कीच उत्तम काम करतील. यासाठी आमच्या शुभेच्छा असे सांगितले.

विद्यालयाच्या वतीने स्वागत करताना विद्यालय विद्यार्थ्यांसाठी करीत असलेले विविध उपक्रम मुख्याध्यापक अशोक डोळसे यांनी सांगितले.

शाला समितीचे सदस्य संजय मुद्गल, ॲड. दीपक शर्मा, ईश्वर बोरा, प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे, पर्यवेक्षिका सौ. नंदा कानिटकर, शिक्षक प्रतिनिधी दीपक आरडे, सौ. दिपाली लगड, शिक्षकेतर प्रतिनिधी गोवर्धन पांडुळे, अमोल कदम, रवींद्र चोभे, अजय पुंड, गणेश नागपुरे, सी.डी. वाघ, श्रीमती क्रांती मुंदानकर, शितल शिंदे, सौ. वृषाली जोशी, माजी विद्यार्थी, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त केलेले श्री वृध्देश्वर विद्यालयाचे विद्यार्थी.

# श्री वृध्देश्वर विद्यालयाचे स्पर्धा परीक्षांमध्ये दैदिप्यमान यश

नगर – अहमदनगर जिल्हा मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेच्या तिसगाव येथील श्री वृध्देश्वर माध्य. व उच्च माध्यमिक विद्यालयाने यंदा स्पर्धा परीक्षांमध्ये दैदिप्यमान यश संपादन करत आपल्या गुणवत्तेची पुन्हा एकदा प्रभावी छाप पाडली आहे. एनएमएमएस परीक्षेत विद्यालयातील तब्बल ३१ विद्यार्थी पात्र ठरून अभिमानाची नवी उंची गाठली आहे.

सातारा सैनिक स्कूल प्रवेश परीक्षेत विद्यालयाचा गुणवान विद्यार्थी चि. आठरे नीरज लहानु याने २७३ गुण मिळवून उज्ज्वल यश संपादन करत विद्यालयाचा गौरव वाढवला आहे.

तसेच, जवाहर नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षेतही विद्यालयाने यशाची पताका फडकवली असून चि. आठरे नीरज लहानु व कु. शिदोरे स्वराली महेश या दोन्ही विद्यार्थ्यांची निवड निश्चित झाली आहे. अहिल्यानगर जिल्हा गणित अध्यापक मंडळ यांच्याद्वारे घेण्यात आलेल्या गणित प्राविण्य परीक्षेत इयत्ता पाचवीचे २६ पैकी तब्बल २३ विद्यार्थी जिल्हा प्रज्ञा पात्र ठरले आहेत. तर आठवीचे ७ विद्यार्थी जिल्हा प्रज्ञा पात्र ठरले आहेत. या कामगिरीबद्दल विद्यालयाच्या प्राचार्या सुनिता कवडीवाले, पर्यवेक्षक बेणके पी के यांनी विद्यार्थ्यांचा व मार्गदर्शक शिक्षकांचा गौरव केला.

विद्यालयातील या यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष रामचंद्र दरे, उपाध्यक्ष डॉ. विवेक भापकर, सचिव ॲड. विश्वासराव आठरे, सहसचिव मुकेश मुळे, खजिनदार ॲड. दीपलक्ष्मी म्हसे, सदस्य डॉ. बाळकृष्ण मरकड, काशिनाथ पा. लवांडे, अरविंद आठरे यांनी अभिनंदन केले आहे.



मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्रशिक्षकांचा छात्रसेवाकाळाचा समारोप सेंट सेव्हिअर्स हायस्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये पार पडला.

# सेंट सेव्हिअर्स हायस्कुलमध्ये सेवापूर्तीकाळ साजरा

नगर – मोहंमदिया एज्युकेशन सोसायटी संचलीत मासुमिया शिक्षणशास्त्र महाविद्यालयातील छात्रशिक्षकांचा छात्रसेवाकाळाचा समारोप सेंट सेव्हिअर्स हायस्कुल अॅण्ड ज्युनिअर कॉलेजमध्ये पार पडला. छात्रशिक्षकांनी दैनंदिन तासिकांप्रमाणे अभ्यासक्रम पूर्ण करुन विविध उपक्रम, स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये प्रश्नमंजुषा, टाकाऊपासून टिकाऊ, खेळ–वृक्षारोपण, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सेंट सेव्हिअर्स हायस्कुलच्या मुख्याध्यापिका ज्योत्सना शिंदे होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून जॉन सर, डॉ. शेख एजाज, केदारी होते.

मुख्याध्यापिका ज्योत्सना शिंदे यांनी छात्रशिक्षकांच्या कामाचे कौतुक केले. यावेळी सय्यद शबाना, शेख शबाना, खान सबा, खान मिसबाह, शेख आफरीन व इतर सर्व कर्मचारीवर्ग उपस्थित होते. स्पर्धेतील यशस्वी विद्यार्थ्यांना पाहुण्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी छात्रशिक्षकांनी परिश्रम घेतले.

# उज्ज्ल भवितव्यासाठी पंचसूत्री अमलात आणा : अॅड. कैलाश दिघे

नगर – प्रत्येक पालकाने आपल्या पाल्याच्या उज्ज्वल भवितव्यासाठी 'पंचसूत्री' चा अवलंब करणे अत्यंत आवश्यक आहे. यामध्ये बालसंस्कार, आर्थिक नियोजन, योग्य विमा संरक्षण, शिक्षण चालू असताना घ्यावयाची काळजी आणि विविध स्पर्धांमध्ये सहभाग या घटकांचा समावेश आहे, असे यावेळी बोलताना अॅड. व इंजि. कैलाश दिघे यांनी ही पंचसूत्री सोदाहरण विस्तृतपणे स्पष्ट करून सांगितली. तसेच आपल्या वैयक्तिक आयुष्यातील अनुभवही पालकांसमोर मांडले. विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी, शाळेत राबविण्यात येणाऱ्या नाविण्यपूर्ण विविध उपक्रमांसाठी तसेच संस्थेच्या प्रगतीसाठी अॅड. दिघे यांनी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमादरम्यान त्यांनी पालकांना पंचसूत्रीवर आधारित बहुपर्यायी प्रश्न विचारले व योग्य उत्तरे देणाऱ्या पालकांना त्यांनी बक्षिसेही दिली.



बोल्हेगाव फाटा येथील अँबिशन अकॅडमी या पूर्वप्राथमिक शाळेतील मोठ्या गटातील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ झाला. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून अॅड. इंजि. कैलाश दिघे उपस्थित होते.

यावेळी वर्षभर राबवलेल्या उपक्रमांमध्ये भाग घेतलेल्या यशस्वी विद्यार्थ्यांनाही सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमास नगरसेवक नवनाथ कातोरे व जाणिव फाऊंडेशनचे प्रदीप वाखुरे व्यासपीठावर उपस्थित होते.

नवनाथ कातोरे यांनीही मनोगत व्यक्त करत संस्थेच्या कार्याचे कौतुक केले.

यावेळी लहानग्या विद्यार्थ्यांनी विविध गुणदर्शनाचे उत्कृष्ट कार्यक्रम सादर करून उपस्थितांची मने जिंकली. आपल्या चिमुकल्यांचे सादरीकरण पाहून पालक, आजी–आजोबांचे डोळे आनंदाने भरून आले.

पालकांच्या वतीने दत्तात्रय खरे यांनी आपल्या मुलीची या शाळेमुळे झालेली सर्वांगीण प्रगती अधोरेखित करत, शाळेचे ऋण कधीही विसरू शकणार नाही, असे भावनिक मनोगत व्यक्त केले.

निवाण नवले या यू के जी च्या चिमुरड्याने अत्यंत भावनिक मनोगत व्यक्त केले, तो म्हणाला की पहिलीत जायचं म्हणून आनंद होतो आहे तर एवढी चांगली शाळा सोडतांना दुःखही होतंय.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सिओना टीचर व स्तुती गायकवाड यांनी केले, तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापिका पूनम गायकवाड यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विकास गायकवाड, शिक्षकवृंद व पालकांनी परिश्रम घेतले.



मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने सिद्धिबाग येथील श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात कृत्रिम पाणवठे तयार करून पक्ष्यांसाठी प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच खाद्याचीही सोय करण्यात आली आहे.

# मोरया युवा प्रतिष्ठानचे पक्षी वाचवा अभियान

नगर – शहरातील मोरया युवा प्रतिष्ठानच्या वतीने सिद्धिबाग येथील श्री सिध्देश्वर देवस्थान परिसरात कृत्रिम पाणवठे तयार करून पक्ष्यांसाठी प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याबरोबरच खाद्याचीही सोय करण्यात आली आहे. २ एप्रिल रोजी हनुमान जयंती निमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, राजु मामा जाधव, आदिनाथ जाधव प्रतिष्ठानचे अध्यक्ष ईश्वर पवार, उपाध्यक्ष स्वामी टाकळकर आणि प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

मोरया युवा प्रतिष्ठान पक्षी वाचवा अभियानच्या माध्यमातुन गेल्या सहा वर्षापासून कार्य करत आहे. याचप्रमाणे प्रत्येक कुटुंबाने पक्षी वाचवा मोहिमेत उत्स्फूर्तपणे सहभागी होण्याची गरज आहे. असे प्रतिपादन मोरया युवा प्रतिष्ठानचे अध्यक्ष ईश्वर पवार यांनी केले आहे. तसेच 'जिथे घर, तिथे पक्षी पाणवठा' ही संकल्पना राबविणे आवश्यक असल्याचे पवार यांनी म्हटले आहे.

आपल्या परिसरात सावलीच्या ठिकाणी व पक्ष्यांना मुक्त वातावरण मिळेल अशा ठिकाणी मातीच्या पसरट भांड्यात पाणी ठेवावे. पक्ष्यांना आंघोळही करता येईल, असे भांडे असावे. पाण्यासोबतच अन्नाची व्यवस्थाही करावी. विशेषतः ज्वारी, बाजरी, गहू, तांदूळ आदी धान्याचा भरडा उत्तम ठरेल. यासह भाताचे शित व पोळ्यांचे बारीक तुकडे करून ठेवावे. ज्याने करून पक्ष्याना आधार मिळेल. असे प्रतिपादन प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष स्वामी टाकळकर यांनी व्यक्त केले.

श्री सिद्धेश्वर देवस्थान परिसरात पक्ष्यांसाठी करण्यात आलेल्या सुविधेप्रमाणे इतर ठिकाणीही नागरिकांनी पक्ष्यांसाठी सुविधा कराव्यात. त्यामध्ये घर तसेच बागांमध्ये मातीची उथळ भांडी पाण्याने भरून ठेवणे, शक्य झाल्यास कृत्रिम घरटी घराच्या परिसरात बसविणे, घराच्या परिसरातील गच्ची, बाल्कनीत पक्ष्यांसाठी खाण्याची सोय करणे, या सुविधा करता येणे नागरिकांना सहज शक्य असल्याचे प्रतिष्ठानचे सदस्य हिमांशु साखला यांनी म्हटले आहे.

### घरटी न तोडण्याचे आवाहन

शहरातील बहुतेक नागरिक हे साफसफाई करताना त्यांच्या घरात अथवा इमारतीतील पक्ष्यांची घरटी काढून टाकतात. त्यामुळे आधीच झाडावर घरटे करू न शकलेल्या या पक्ष्यांचा निवारा काढला जातो. निवाऱ्याचा पर्याय न मिळाल्याने ते उन्हाचे बळी ठरतात. त्यामुळे उन्हाळ्यात नागरिकांनी इमारतींमधील पक्ष्यांची घरटी तोडू नये, शक्य झाल्यास कृत्रिम घरटी घराच्या परिसरात बसवावी, असे आवाहनही प्रतिष्ठानचे शुभम टाकळकर, धिरज पोखरणा, मनोज लुनिया, दर्शन चनोदिया, सागर शर्मा, अतिश शिंगरे, गौर जाना, हिमांशू साखला, अंकुश गोयल, मयूर व्यास आणि सर्व सदस्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# 'आरपीआय (गवई)' ची शहर कार्यकारिणी जाहीर

## लवकरच जिल्हाव्यापी मेळावा; राहुरी विधानसभा निवडणुकीत उमेदवार देण्याचे संकेत

नगर – शहरातील रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत शहराची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. शहर जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के व महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक झाली. शहर, उपनगर तसेच नगर तालुक्यातील कार्यकर्ते आणि महिला पदाधिकारी उपस्थित होत्या.



रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई) पक्षाची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीत शहराची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

बैठकीत बोलताना सुशांत म्हस्के यांनी सांगितले की, काही महिन्यांपूर्वी पक्षाची कार्यकारिणी बरखास्त करण्यात आली होती. त्यानंतर जुने व नवीन कार्यकर्ते यांचा समन्वय साधत नव्या कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली आहे. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना पदाच्या माध्यमातून संधी देण्यात आली असून, पक्ष हा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांवर आधारित असून सर्व जाती–धर्माला सोबत घेऊन वाटचाल करतो, असे त्यांनी स्पष्ट केले. नवीन पदाधिकाऱ्यांना एका वर्षाचा कार्यकाळ देण्यात आला असून, त्यांनी प्रभावी काम करून पक्षविस्तार करावा व अधिकाधिक कार्यकर्ते जोडावेत, असे आवाहन करण्यात आले. समाजातील कोणत्याही घटकावर अन्याय किंवा अत्याचार झाल्यास पक्ष त्याविरोधात आवाज उठवून न्याय मिळवून देण्यासाठी कटिबद्ध असल्याचेही म्हस्के यांनी नमूद केले. सध्या जाती–धर्मात भांडण लावण्याचे राजकारण सुरू असून, अशा परिस्थितीत पक्षाची जबाबदारी अधिक वाढली असल्याचे त्यांनी सांगितले.

लवकरच जिल्हाव्यापी मेळावा आयोजित करण्यात येणार असून, या मेळाव्यासाठी पक्षप्रमुख राजेंद्र गवई उपस्थित राहणार असल्याची माहिती देण्यात आली. तसेच युवकांना जिल्ह्यात काम करण्याची मोठी संधी असून, गावागावातील प्रश्न सोडविण्यासाठी युवकांनी एकत्र यावे, असे आवाहन करण्यात आले. आगामी राहुरी विधानसभा निवडणुकीत पक्षाचा उमेदवार देण्यात येणार असल्याचेही संकेत त्यांनी दिले.

यावेळी दानिश शेख यांनी सांगितले की, आरपीआयच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत काम सुरू आहे. शहरात पक्षाचे कार्य भक्कम झाले असून, चळवळीतील कार्यकर्ते निळ्या झेंड्याखाली एकत्र आले आहेत. सत्ताधारी राजकारणात जाती–धर्मात भांडणे लावून सोयीचे राजकारण केले जात असल्याचा आरोप त्यांनी केला. यामुळे गोरगरीब जनतेला मोठा त्रास सहन करावा लागत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

महिला आघाडीच्या ज्योतीताई पवार यांनी महिलांच्या विविध प्रश्नांवर पक्षाने सातत्याने आवाज उठविला असल्याचे सांगितले. जिल्ह्यातील अनेक प्रकरणांमध्ये महिलांना न्याय मिळवून देण्यात पक्षाची महत्त्वाची भूमिका राहिली आहे. पुढील काळात महिलांचे संघटन अधिक मजबूत करून त्यांच्या प्रश्नांवर काम केले जाईल, असे त्यांनी नमूद केले.

या बैठकीत शहर जिल्हा कार्याध्यक्ष दानिश शेख, अल्पसंख्यांक जिल्हाध्यक्ष गुलामअली शेख, युवक शहराध्यक्ष विजय शिरसाठ, अल्पसंख्यांक जिल्हा कार्याध्यक्ष नईम शेख, अल्पसंख्यांक शहर जिल्हाध्यक्ष अजीम खान, नगर तालुका अध्यक्ष सचिन शिंदे, भिंगार शहराध्यक्ष स्वप्निल साठे, अल्पसंख्यांक शहर जिल्हा कार्याध्यक्ष मुस्तफा शेख, शहर सचिव विनीत पाडळे, युवक आघाडी शहर जिल्हा कार्याध्यक्ष लकी वाघमारे, युवक शहराध्यक्ष उमेश गायकवाड, नगर तालुका युवक अध्यक्ष विपुल भोसले, तालुका युवक कार्याध्यक्ष रोहित थोरात, अल्पसंख्यांक जिल्हा उपाध्यक्ष जमीर शेख, ओबीसी आघाडी शहर जिल्हाध्यक्ष हर्षल जाधव, शहर उपाध्यक्ष निजाम शेख, अरबाज शेख, ओबीसी आघाडी शहर जिल्हाध्यक्ष विकास पटेकर, शहर उपाध्यक्ष जावेद सय्यद, हुसेन चौधरी, अमोल चव्हाण, युवराज कंडारे, कायदा सल्लागार आघाडी शहर जिल्हाध्यक्ष आदिल शेख, शहर संघटक आफताब बागवान, शहर उपाध्यक्ष युवक आघाडी योहान चाबुकस्वार, वैद्यकीय आघाडी शहर जिल्हाध्यक्ष इमरान शेख, वाहतूक आघाडी शहर जिल्हा अध्यक्ष निखिल मगर यांची निवड करण्यात आली.

तसेच महिला आघाडीमध्ये शहर उपाध्यक्ष संगीता पाटोळे, खजिनदार मनीषा गायकवाड, तालुका उपाध्यक्ष वैशाली आल्हाट, शहर जिल्हा सचिव प्रमिला पाटोळे, केडगाव उपाध्यक्ष विश्रांती पठारे, शहर संघटक पूजा साठे, नगर तालुका उपाध्यक्ष सोनाली साळवे, शहर जिल्हा उपाध्यक्ष सविता भालेराव, युवती शहराध्यक्ष शितल नाटीकर, शहर जिल्हा कार्याध्यक्ष सारिका साळवे, पारनेर तालुका अध्यक्ष धनश्री चाबुकस्वार यांचीही निवड करण्यात आली.

# रस्तेग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत ५ एप्रिलला शिव पाणंद चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन

नगर – राज्यातील शेतरस्त्यांच्या ज्वलंत प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी शिव पाणंद शेत रस्ते चळवळीचे राज्यस्तरीय अधिवेशन येत्या ५ एप्रिल रोजी श्री क्षेत्र चैतन्य कानिफनाथ देवस्थान, मढी (ता. पाथर्डी) येथे आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनासाठी देवस्थान ट्रस्टकडून चळवळीला मोलाचे सहकार्य देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे.

शिव पाणंद शेत रस्ते चळवळीने राज्यभरातील रस्तेग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर शासन पातळीवर महत्त्वपूर्ण आदेश काढून अभूतपूर्व यश मिळवले आहे. या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांमध्ये जागृती निर्माण करणे आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीत येणाऱ्या अडचणींवर उपाय शोधणे, हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे.

अधिवेशनात महसूल, भूमी अभिलेख, पोलीस विभाग तसेच कायदेशीर तज्ज्ञांचे मार्गदर्शन होणार असून, विविध समस्यांवर सखोल चर्चासत्रे आयोजित करण्यात येणार आहेत. तसेच, ज्या तालुक्यांमध्ये उल्लेखनीय काम झाले आहे, त्या ठिकाणच्या अधिकाऱ्यांचा सन्मान केला जाणार आहे. अडचणी निर्माण होणाऱ्या तालुक्यांतील समस्यांचे विश्लेषण करून संबंधित यंत्रणांच्या कार्यपद्धतीत सुधारणा करण्यासाठी तज्ज्ञांशी विचारविनिमय करण्यात येणार आहे.

या संदर्भात शासकीय विश्रामगृहात चळवळीचे प्रणेते शरदराव पवळे यांच्या अध्यक्षतेखाली बैठक पार पडली. बैठकीत अधिवेशनाचे नियोजन अंतिम करण्यात आले. अधिवेशनाची वेळ सकाळी १० ते सायंकाळी ५ अशी निश्चित करण्यात आली आहे. यावेळी जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना अतिक्रमित, बंद किंवा अडवलेल्या शिव पाणंद व वहिवाटीच्या रस्त्यांबाबत निवेदन देण्यात आले. कार्यक्रमाच्या तयारीसाठी उपजिल्हाधिकारी गणेश मरकड तसेच देवस्थान ट्रस्टचे पदाधिकारी व चळवळीचे कार्यकर्ते उपस्थित होते.

या अधिवेशनामुळे राज्यातील शेतकरी बांधवांच्या शेतरस्त्यांच्या प्रश्नांना दिशा मिळून पुढील पिढीसाठीही हा उपक्रम प्रेरणादायी ठरेल, असा विश्वास चळवळीचे प्रणेते शरदराव पवळे यांनी व्यक्त केला.



केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थिनी मेळावा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

# महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात माजी विद्यार्थिनींचा भावनिक मेळावा

## आठवणींना उजाळा, माजी विद्यार्थी संघाची स्थापना, विद्यार्थिनी, शिक्षक आणि पालकांचा सहभाग

नगर – केडगाव येथील महाराणी ताराबाई कन्या विद्यालयात आयोजित करण्यात आलेला माजी विद्यार्थिनी मेळावा उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला. माजी विद्यार्थिनींची उपस्थिती लाभलेल्या या कार्यक्रमाने शाळेच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी विद्यार्थिनींचे स्वागत करण्यात आले. सौ. छाया सुंबे यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रमाचा उद्देश स्पष्ट केला. सरस्वती पूजनाने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. या मेळाव्यादरम्यान माजी विद्यार्थिनींनी आपल्या मनोगतातून शाळेतील सुवर्णकाळातील आठवणींना उजाळा दिला. शिक्षकांविषयीचा आदर, शिस्तबद्ध शिक्षणपद्धती आणि जपलेले स्नेहबंध यांचे भावनिक शब्दांत वर्णन करण्यात आले. अनेकांच्या मनोगतातून शाळेने घडवलेले व्यक्तिमत्त्व आणि दिलेली मूल्ये अधोरेखित झाली.

यावेळी निवृत्त जेष्ठ शिक्षिका खिस्ती मॅडम व सौ. गरड मॅडम यांनीही आपल्या अनुभवसंपन्न आठवणी सांगत विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. वासंती धुमाळ यांनी माजी विद्यार्थी संघाची आवश्यकता, उद्दिष्टे व भावी कार्ययोजना याबाबत सविस्तर माहिती दिली. त्यांनी विद्यार्थिनींना संघटनात्मक कामात सक्रिय राहण्याचे आवाहन करत शाळेच्या प्रगतीत योगदान देण्यास प्रोत्साहित केले.

यानंतर माजी विद्यार्थी संघाची कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. अध्यक्षपदी सुषमा कदम, उपाध्यक्षपदी सौ. कोमल भांडे, सचिवपदी श्वेता भोर, कोषाध्यक्षपदी प्राप्ती ढोरकुले, खजिनदारपदी आफरीन सय्यद, सहखजिनदारपदी सिद्धी कुलकर्णी यांची निवड करण्यात आली. तसेच जालिंदर सातपुते यांची सल्लागार शिक्षक सदस्य म्हणून निवड झाली. थिटे नूतन यांचाही शिक्षक सदस्य म्हणून समावेश करण्यात आला.

पालक सदस्य म्हणून सौ. गरड सुरेखा विनायक, श्रीमती काकडे सुजाता, श्रीमती करांडे सुवर्णा, श्रीमती होंडे वृषाली, श्रीमती नाणेकर अनिता, श्रीमती खरात पल्लवी यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान निवृत्त जेष्ठ शिक्षक श्री. गारुडकर यांनी आपल्या भाषणातून माजी विद्यार्थिनींचे शाळेशी असलेले नाते अधिक दृढ करण्याचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या सर्वांगीण विकासात माजी विद्यार्थी संघाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असल्याचे त्यांनी नमूद केले. एकूणच, हा मेळावा केवळ भेटीगाठींचा न राहता शाळेप्रती असलेल्या आत्मीयतेचा आणि एकतेचा सुंदर उत्सव ठरला. जालिंदर सातपुते यांनी आभार मानले.

# श्रीराम मंदिरातील नृत्याविष्काराने भाविक झाले दंग

## ट्रेकॅप–धरोहर व अंजली नृत्यालयाचा उपक्रम, भरतनाट्यमच्या माध्यमातून नृत्यसेवा



नगर – राम नवमीनिमित्त नवीपेठ येथील श्रीराम मंदिरात श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ ट्रस्टतर्फे ट्रेकॅम्प–धरोहर व अंजली नृत्यालय यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आलेल्या नृत्यवंदनेने उपस्थित भाविकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले.

प्राचीन मंदिरांबाबत जनजागृती करणारी ट्रेकॅम्प–धरोहर संस्था आणि अंजली नृत्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रामनवमीनिमित्त ही भरतनाट्यम नृत्यसेवा आयोजित करण्यात आली होती. श्रीराम नवमीच्या पूर्वसंध्येला नेता सुभाष चौकाजवळ असणार्या श्रीराम मंदिरात अंजली नृत्यालयाच्या विद्यार्थिनींनी गीत रामायणामधील पद, श्रीराम भजन, श्रीराम अष्टकम, रामरक्षा स्तोत्र, पदम आदी विविध भक्तीपूर्ण नृत्याविष्कार भरतनाट्यम् कलेद्वारे सादर केले. या कार्यक्रमास भाविकांची गर्दी झाली होती. त्यांनी या नृत्याविष्काराचा आनंद घेतला.

कार्यक्रमानंतर अनेक भाविकांनी मनोगतात या नृत्यवंदना उपक्रमाचे कौतूक कले. जणू आपण अयोध्या नगरीत आलो आहोत, असा भास झाल्याचे काहींनी सांगितले. श्रीरामस्तुतीच्या गीतांवर तरुणींनी भरतनाट्यम्चा नृत्याविष्कार बहारदारपणे सादर केला. या सुमधूर कलाविष्काराला रसिकांनी टाळ्यांच्या गजरात दाद दिली. सुरेखा डावरे यांच्या मार्गदर्शनाखाली अंजली नृत्यालयाच्या संस्कृती धुमाळ, अस्मिता दोडे, श्रुती ढोकणे, अस्मी चावक, वैष्णवी नरोड आणि करिश्मा कोठारी–जोशी यांनी अतिशय सुंदर पद्धतीने गीत रामायणातील 'सेतू बांधा रे सागरी...' तसेच रामाष्टकम, रामरक्षा स्तोत्र, श्रीराम चंद्र कृपाळू भजनं यावर मनमोहक नृत्य सादर केले.

नृत्यविशारद पदवीधारक करिश्मा कोठारी–जोशी हिने लतादीदींच्या आवाजातील वात्सल्य भावातील 'ठुमक चलत रामचंद्र...' यावर भावपूर्ण नृत्य सादरीकरण केले. श्री हनुमानाच्या वेषभूषेत ६ वर्षांच्या पिहू जोशी या बालिकेने आपली भूमिका उत्तम बजावली.

नृत्यसेवेनंतर श्रीराम मंदिर व्यवस्थापनातर्फे कलाकारांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास नगर शहरासह जिल्ह्यातून भाविक आले होते.

# चिंचोलीच्या मळाई–मळगंगा देवीचा यात्रोत्सव

## राज्यातील हजारो भाविक येणार, तयारी पूर्ण

नगर – चिंचोली, ता.पारनेर येथील मळाई वडजाई – मळगंगा मातेचे मुख्य ठाणे असलेल्या देवीच्या चैत्र यात्रोत्सवाची जय्यत तयारी सुरु असून ही यात्रा ९ एप्रिल रोजी होत असल्याची माहिती देवस्थानचे सचिव आनंदराव पिंपरकर यांनी दिली.

देवीला हळद लावण्याचा पारंपारिक विधी २ एप्रिल रोजी महिलांचे उपस्थितीत झाला. त्यावेळी अन्नदान–महाप्रसाद वाटप करण्यात आले.

पारनेर तालुक्यातील चिंचोली येथे ७० एकराचे निसर्गरम्य परिसरात मळाई देवीच्या मुळपीठावरील पुरातन मंदिराचा जीर्णोध्दार भाविकांच्या सहभागातून राजस्थानमधील लाल रंगाचे बन्सी पहाडपूर कोरीव दगडात करण्यात आलेला आहे. हे देवस्थान राज्यातील लाखो भाविकांचे कुलदैवत असून, भाविकांच्या मनोकामना येथे भेट दिल्याने पूर्ण होतात असा विश्वास असल्याने, यात्रेनिमित्त राज्यभरातील लाखो भाविक येतात.

यात्रोत्सवाच्या दिवशी सकाळी ९ एप्रिल रोजी गावातून छबीना मिरवणुक निघणार आहे. या मिरवणुकीत भक्तगण दंडवत घालून सहभागी होतील. दिवसभर मंदिरात शेरणी महाप्रसादाचे आयोजन केलेले आहे. तसेच भाविक आपल्या कुलदेवतेच्या चरणी नतमस्तक होवुन धार्मिक विधी करतात.

या उत्सवातील मुख्य आकर्षण गर्दीचा उच्चांक – म्हणजे दुपारी मानाच्या काठी पालखीचे पूजन, मिरवणुक व देवीच्या कळशाला काठी भेटीचा कार्यक्रम होईल. १० एप्रिल रोजी बैलगाडा शर्यतीचा कार्यक्रम होईल.

या यात्रोत्सवाला मोठी धार्मिक परंपरा इतिहास लाभलेला आहे. यात्रोत्सवाचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे आवाहन मुंबईकर तरुण मित्रमंडळ, देवस्थान ट्रस्ट मंडळ व ग्रामस्थ चिंचोली यांनी केले आहे.

# धनगरवाडी येथे श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहात

## भाविकांनी घेतला महाप्रसाद व महाआरतीचा लाभ

नगर – नगर–छत्रपती संभाजीनगर रोडवरील धनगरवाडी येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिर व श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या सोहळ्यानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या विविध धार्मिक कार्यक्रमांना हजारो भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाप्रसाद व महाआरतीचा लाभ घेतला.

पहाटेच्या मुहूर्तावर झालेला जन्मोत्सव सोहळा विशेष आकर्षणाचा ठरला. मंदिर परिसरात भजन, आरती व धार्मिक विधींच्या माध्यमातून भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. त्यानंतर दुपारी आयोजित महाप्रसादासाठी तब्बल दहा ते पंधरा हजार भाविकांनी उपस्थिती लावली. सायंकाळी पार पडलेल्या महाआरतीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला.



नगर–छत्रपती संभाजीनगर रोडवरील धनगरवाडी येथे श्री संकटमोचन हनुमान मंदिर व श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टच्या वतीने श्री हनुमान जन्मोत्सव उत्साहपूर्ण आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.

या सोहळ्यास आमदार संग्राम जगताप, मंगल भक्त सेवा मंडळाचे राजाभाऊ कोठारी, भाजप युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अक्षय कर्डिले तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक संदीप कर्डिले यांच्यासह ट्रस्टचे पदाधिकारी उपस्थित होते. विशेष म्हणजे हा उत्सव यंदा अकराव्या वर्षात पदार्पण करत असल्याने त्याचे औचित्य अधिकच वाढले होते.

यावेळी बोलताना आमदार संग्राम जगताप यांनी सांगितले की, राज्य शासनाच्या माध्यमातून जुन्या व पुरातन मंदिरांचा विकास करण्यात येत आहे. उपनगर व शहरालगत असलेल्या मंदिरांचा जीर्णोद्धार भाविक आणि युवकांच्या पुढाकारातून होत असून, त्यामुळे भक्तांना अधिक चांगल्या सुविधा उपलब्ध होत आहेत. श्री संकटमोचन हनुमान सेवा ट्रस्टचे धार्मिक व अध्यात्मिक उपक्रम स्तुत्य असून, अशा उपक्रमांमुळे समाजात संस्कारित पिढी घडण्यास हातभार लागतो. धर्माशी जोडलेली पिढी देशाच्या प्रगतीत महत्त्वपूर्ण योगदान देत असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच, संकटमोचन हनुमानजींच्या नावाने कार्यरत असलेले हे युवकांचे संघटन भविष्यातही संकट काळात समाजसेवेसाठी तत्पर राहील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजाभाऊ कोठारी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, भगवंताच्या कृपेने हे सेवा कार्य अखंडपणे सुरू आहे. एकनिष्ठता आणि समर्पणाच्या भावनेतून ट्रस्ट कार्यरत असून, धर्मासाठी युवकांच्या हातून घडणारी सेवा निश्चितच कौतुकास्पद असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.




**दिवसभराची धांदल, कामाचा ताण आणि खाण्यापिण्याच्या खराब सवयींचा आपल्या हृदयाच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. त्यामुळेच हल्ली हृदयविकाराच्या झटक्यासारख्या घटना अचानक ऐकायला मिळत आहेत. हृदयविकाराचा झटका टाळण्याचा सर्वात सोपा मार्ग म्हणजे हृदयाचे ऐकणे आणि त्याचे संकेत समजून घेणे.**



# हाडे पोकळ होण्याच्या प्रमाणात वाढ

आपल्या शरीरात रोज लाखो पेशी विभाजित होतात आणि नव्या तयार होतात. हाडेदेखील त्याला अपवाद नाहीत. 'बोन रिमॉडेलिंग' या नैसर्गिक प्रक्रियेमध्ये हाडांचा ताण-तणाव, आहार, हार्मोनल बदल आणि वय महत्त्वाची भूमिका बजावतात; मात्र काही वेळा हा समतोल बिघडतो आणि हाडांची घनता (बोन डेन्सिटी) कमी होऊ लागते. सुरुवातीचा टप्पा म्हणजे ऑस्टिओपेनिया, तर पुढील गंभीर अवस्था ऑस्टिओपोरोसिस. ही अवस्था म्हणजे हाडे पोकळ, नाजूक आणि ठिसूळ होणे.

या प्रक्रियेची सुरुवात शांत असते; पण शरीर मात्र संकेत देत असते. हे संकेत ओळखले, तर पुढील आयुष्य सुरक्षित राहू शकते.

लक्षणे

लहान धक्क्यातही असह्य वेदना : कधी कधी अगदी हलका आघात, पाय घसरून बसणे, दरवाजा लावताना धक्का, वजन उचलताना किरकोळ ताण यांतही तीव्र वेदना जाणवते. हाडे कमजोर होत असल्याचे हे पहिले लक्षण असू शकते.

उंची हळूहळू कमी होणे : वय वाढल्यावर



एक-दोन सेंटिमीटर उंची कमी होणे स्वाभाविक आहे; पण त्यापेक्षा जास्त घट झाल्यास कण्यातील मणके संकुचित होण्याची शक्यता असते. कॉंप्रेशन फ्रॅक्चर हा ऑस्टिओपोरोसिसचा मोठा इशारा आहे.

पाठीचा वाकलेला आकार: थोरॅसिक स्पाईन वाकल्यास व्यक्तीचा शरीर कमानीसारखे दिसू लागते. यामुळे पोश्चर, संतुलन आणि श्वसनावरही परिणाम होतो.

नखे, केस व त्वचेतील बदल : कॅल्शियम, प्रोटिन व ट्रेस मिनरल्स कमी पडल्यास नखे तुटणे, केस पातळ होणे, त्वचेवर कडी पडणे हीही अप्रत्यक्ष चिन्हे असतात.

सततची पाठदुखी किंवा कंबरदुखी : स्नायूंचा सपोर्ट कमी झाल्यामुळे आणि मणके कमजोर झाल्यामुळे पाठीत, कंबरेत सतत वेदना जाणवतात.

जोखीम जास्त कोणाला?

४०+ वय

रजोनिवृत्तीनंतरच्या महिला

व्हिटॅमीन डीची कमतरता

दीर्घकाळ स्टिरॉइड औषधं

धूम्रपान, मद्यसेवन

जास्त प्रमाणात साखर, प्रोसेस्ड फूड

कमी वजन किंवा अत्यंत कमी आहार

दीर्घकाळ बसून काम करणारे

ही सर्व कारणे हाडांच्या नैसर्गिक प्रक्रिया बाधित करतात.

✻ हाडे मजबूत करण्यासाठी समग्र योजना

कॅल्शियम आणि व्हिटॅमिन डी : दूध, दही, तीळ, पनीर, हिरव्या भाज्या. १५-२० मिनिटे सकाळचा सूर्यप्रकाश. आवश्यक असल्यास डॉक्टरांच्या सल्ल्याने सप्लिमेंट्स.

**व्याधी विचार**

वेट-बेअरिंग व्यायाम : हाडांना 'मेकॅनिकल स्ट्रेस' दिल्यास हाडांची घनता वाढते. उदाहरणार्थ, चालणे, जिने चढणे, हलके धावणे, सायकलिंग, योगातील बॅलन्सेस.

स्ट्रेंथ ट्रेनिंग : स्नायू मजबूत झाल्यास हाडांवरील भार समान पद्धतीने वितरीत होतो. ग्लुट्स, कोअर, लेग्ज आणि बॅक मजबूत असतील, तर फ्रॅक्चरचा धोका कमी होतो.

प्रोटिन पुरेसे घ्या : हाडांचे तीस-पस्तीस टक्के वजन हे प्रोटिनचे असते. डाळी, अंडी, दूध, मोड आलेली कडधान्ये, पनीर हे अत्यंत आवश्यक.

जीवनशैली सुधारणा : धूम्रपान थांबवा. मद्य मर्यादित करा. झोप पूर्ण घ्या. स्ट्रेस कमी करण्यासाठी ध्यान

# लहान मुलांनाही पाठदुखी?

अलीकडच्या दशकात पाठीदुखी हा प्रौढांचा नव्हे, तर मुलांचाही सामान्य आजार बनला आहे. शहरांमध्ये राहणाऱ्या आठ ते १५ वयोगटातील मुलांमध्ये कंबरदुखी, खांद्याचा ताण, मानदुखी किंवा पोश्चर बिघडण्याचे प्रमाण चिंताजनकरीत्या वाढले आहे.

यामागे मोठा दोषी म्हणजे शाळेची जड बॅग, चुकीची बसण्याची सवय, वाढलेला स्क्रीन टाइम आणि मोकळ्या मैदानी खेळाचा अभाव. वाढत्या वयात कण्यावर चुकीचा ताण पडला, तर पोश्चर व वाढ यांवर दीर्घकालीन परिणाम होऊ शकतो, म्हणूनच मुलांच्या पाठदुखीचे योग्य वेळी निदान आणि प्रतिबंध अत्यंत गरजेचे आहे.



शाळेच्या बॅगचे वजन

जागतिक व बालरोग तज्ज्ञांच्या मार्गदर्शनानुसार, 'बॅगचे वजन मुलाच्या शरीरभाराच्या दहा टक्क्यांपेक्षा जास्त नसावे. यापेक्षा जास्त वजनामुळे कण्यावर ताण निर्माण होतो. मुलं सरळ उभं न राहता पुढे झुकतात. त्यामुळे सर्व्हायकल व लंबर स्पाईनवर अनावश्यक दाब वाढतो.

जड बॅगचे परिणाम

खांदे पुढे जाणे: बॅग जड असेल तर मुलं आपोआप पुढे झुकतात. यामुळे पाठीच्या वरच्या भागावर ताण वाढतो.

पोस्चर बिघडणे : कण्याची नैसर्गिक वक्रता चुकीच्या स्थितीत ढकलली जाते. हळूहळू ही नवीन चुकीची पोश्चर 'सवय' बनते.

मानदुखी व खांदेदुखी : बॅगचे ओझे दोन्ही खांद्यांवर समान नसेल किंवा पट्टे बारीक असतील, तर मान व खांद्यावरील स्नायूंना ताण येतो.

कमालीचा थकवा व अभ्यासावर परिणाम : पाठीवर ताण असेल तर मुलांचे लक्ष विचलित होते, थकवा वाढतो आणि अभ्यासावरही परिणाम होतो.

लांब पल्ल्याची जोखीम : कित्येक मुलांमध्ये 'अर्ली डिस्क चेंजेस', 'मसल इंबॅलन्स' किंवा 'फ्लॅट फीट'सारख्या समस्या दिसू शकतात.

**जाणून घ्या**

बॅग निवडताना - दोन जाड, ॲडजस्टेबल पट्टे (दोन्ही खांद्यांवर समान वजन वाटतो), कुशन्ड बॅक सपोर्ट (पाठीवर दाब कमी होतो), वेस्ट बेल्ट (बॅगेचे वजन कंबरेवर वितरीत होते), अनेक कप्पे (वजन समान पद्धतीने ठेवता येते), बॅग पाठीच्या जवळ ठेवणे, हलकी बॅग निवडा (बॅगच १.५ - २ किलो असेल तर त्यात पुस्तकांनंतर वजन खूप वाढते).

घरी व शाळेत योग्य पोश्चरची सवय - उंचीला मिळतीजुळती खुर्ची-टेबल, मोबाइल/टॅब हातात धरून खाली पाहणे टाळा. स्क्रीन डोळ्यांच्या लेव्हलवर ठेवा. दर तीस-चाळीस मिनिटांनी दोन-तीन मिनिटे ब्रेक घ्या. दररोज ३०-४५ मिनिटे मैदानी खेळ (धावणे, सायकलिंग, कॅच-कॅच, फुटबॉल, कबड्डी) हे उत्तम.

योग्य आहार-

प्रोटिन्स : अंडी, दुधाचे पदार्थ, पनीर, डाळी, मोड आलेली कडधान्ये

कॅल्शियम : दूध, तीळ, आल्याचा गूळ, बदाम

व्हिटॅमिन डी : सकच्या उन्हात १५-२० मिनिटे

ओमेगा-३ : अक्रोड, जवस

पाणी : दिवसाला दीड-दोन लिटर

या लक्षणांकडे लक्ष द्या

पाठीचा, कंबरेचा किंवा खांद्याचा त्रास वारंवार होणे, बॅग हलकी करूनही वेदना न जाणे, चालताना विचित्र पोश्चर किंवा वाकणे, रात्री वेदनेने जाग येणे, पायात मुंग्या किंवा कमजोरी.

# शरीराचं तापमान कमी करायचंय?

उन्हाळा सुरू झाला, की बाहेरचं तापमान वाढतं; पण अनेकांच्या शरीरातली उष्णताही त्याच वेगाने वाढते. त्यामुळे डोळ्यांत जळजळ होणे, छातीत जळजळ होणे, अंगावर उष्णतेचे फोड येणे, सतत उष्णता जाणवणे आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे तळपायांची सतत जळजळ, अशा अनेक त्रासांना सामोरं जावं लागतं. काही लोकांच्या शरीरात नैसर्गिकरित्या उष्णतेचं प्रमाण जास्त असल्याने हा त्रास उन्हाळ्यात अधिक जाणवतो. अशा वेळी शरीराला आतून थंडावा देणारे काही सोपे घरगुती उपाय उपयोगी ठरू शकतात.

**थंड पदार्थ–** शरीरातील उष्णता किंवा पित्त कमी करण्यासाठी आहारात थंड पदार्थांचा समावेश करा. त्यासाठी आहारात काकडी, आवळा, कलिंगड, ब्रोकोली इत्यादी पदार्थ खाऊ शकता. यामुळे शरीरातील उष्णता कमी होईल, आरोग्यालाही फायदा होईल. या व्यतिरिक्त आहारात आणखी काही ठराविक पदार्थांचा समावेश केला तर जास्त फायदा होतो.

**'हे' पदार्थ उष्णता कमी करायला मदत करतात**

मनुका - शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी मनुका हा एक उत्तम उपाय आहे. रात्री १०० ग्रॅम मनुका कोमट पाण्यात भिजवून ठेवा. सकाळी उठल्यावर ते मनुके चावून खा आणि ते पाणी प्या. यामुळे शरीराला थंडावा मिळतो.

जिरे - जिरे खूपच थंड असतात. रात्री एका कप पाण्यात अर्धा चमचा जिरे घालावेत. सकाळी हे पाणी प्यावं. यामुळे शरीराला थंडावा मिळतो आणि वजनही नियंत्रणात राहते.

सब्जा - सब्जादेखील शरीराला थंड ठेवण्यासाठी उपयुक्त मानले जाते. रात्री सब्जा पाण्यात भिजवून ठेवून सकाळी त्यात थोडी खडीसाखर घालून उपाशीपोटी पिणे फायदेशीर ठरते.

पुदिना - पुदिना हा एक नैसर्गिकरित्या थंडावा देणारा पदार्थ आहे. जेवणात पुदिन्याची चटणी किंवा पुदिन्याचा समावेश केल्यास शरीराला आराम मिळतो. पुदिन्याचे पाणी प्यायल्यास ताजेतवाने वाटते आणि शरीर हायड्रेट राहते.

कोकम सरबत -

कधी खूप मसालेदार किंवा जंक फूड खाल्ले असेल, तर काही वेळानंतर लगेच कोकम सरबत पिणे फायदेशीर ठरते. कोकम शरीरातील उष्णता कमी करण्यास मदत करते.

नारळ पाणी– तापमान झपाट्याने वाढणे शरीरासाठी चांगले नसते. अशा परिस्थितीत नारळाचे पाणी पिऊ शकता. यामध्ये विविध प्रकारची जीवनसत्त्वे आणि खनिजेदेखील भरपूर असतात. ते उन्हाळ्यात शरीराला रोगांपासून वाचवण्यास मदत करतात.


ताक - उन्हाळ्यात ताक पिणेही अतिशय फायदेशीर मानले जाते. ताकाचा थंड प्रभाव असल्याने शरीरातील उष्णता कमी होण्यास मदत होते. ताक पोषक तत्वांनी समृद्ध आहे. ते शरीराला ऊर्जा देते. उष्णतेचा सामना करण्यासाठी, दररोज एक ग्लास थंड ताक प्या.

**आरोग्यमंत्र**

वेळेवर खा - शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी वेळेवर आहार घेणे खूपच आवश्यक आहे. यामुळे शरीरातील ऊर्जा योग्य पद्धतीने वापरली जाते आणि पाचक रसांची निर्मिती होते. शरीराला थंडावा देण्यासाठी जेवणासोबत सॅलड जरूर खा.

**उष्णता वाढवणारे पदार्थ टाळा**

उन्हाळ्यात उष्णता वाढवणारे पदार्थ टाळा. काळी मिरी, दालचिनी, लवंग यासारखे गरम मसाले शरीरातील उष्णता वाढवतात. त्यामुळे या सर्व गोष्टी खाणे टाळा.





# उकाडा आणि मानसिक आरोग्य

नवीन अभ्यासातून एक धक्कादायक माहिती समोर आली आहे. उकाडा आणि हवेतील प्रदूषण हे दोन्ही मिळून मानसिक आरोग्यावर खूप वाईट परिणाम करतात. अमेरिकेतील युटा राज्यात २००० ते २०१६ या १६ वर्षांत झालेल्या सुमारे ७,५०० आत्महत्यांच्या घटनांचा अभ्यास करण्यात आला. 'युटा' विद्यापीठातील संशोधकांनी हा अभ्यास केला असून तो आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झाला आहे.

आतापर्यंत उष्ण दिवसांत आत्महत्येच्या घटना वाढतात आणि हवेचे प्रदूषणही धोका वाढवते असे वेगवेगळे अभ्यास सांगत होते; पण हे दोन्ही एकत्र आल्यावर काय होते हे पहिल्यांदाच इतक्या सखोलपणे तपासले गेले. संशोधकांनी 'वेट बलब ग्लोब टेम्परेचर' ही खास पद्धत वापरली. ही फक्त तापमान नव्हे, तर उकाडा, आर्द्रता, वारा यांचा विचार करते. म्हणजे शरीराला खरंच किती त्रास होतो हे मोजते. अभ्यास सांगतो, की प्रत्येक ५ अंश सेल्सिअस उकाडा वाढल्यास आत्महत्येचा धोका ५ टक्क्यांनी वाढतो. हा धोका मार्चअखेर ते सप्टेंबरअखेर जास्त दिसतो.

**आरोग्य चर्चा**

सगळ्यात चिंतेची गोष्ट म्हणजे वाहन आणि कारखान्यांतून निघणारा नायट्रोजन डायऑक्साइड हा वायू. उन्हाळ्यात हा वायू जास्त असल्यास उकाड्याचा धोका तब्बल ५० टक्क्यांनी वाढतो. म्हणजे उष्णता आणि प्रदूषण एकत्र आले, की परिणाम खूप गंभीर होतो. थंडीच्या दिवसांतही हा वायू तापमानाशिवाय धोका वाढवतो. हवामान बदल, वाढत्या उष्ण लाटा आणि प्रदूषण यामुळे भविष्यात हा धोका आणखी वाढू शकतो.


संशोधक आता अनुवांशिक घटकांचाही अभ्यास करणार आहेत, जेणेकरून कोण जास्त धोक्यात आहे हे ओळखता येईल. हे संशोधन सांगते, की स्वच्छ हवा आणि उष्णतेच्या लाटांपासून संरक्षण ही आत्महत्या रोखण्याची नवीन दिशा आहे. प्रदूषण कमी केल्यास आणि उकाड्याच्या काळात लोकांना आधीच सावध केल्यास अनेक जीव वाचवता येतील.

# भारतीयांच्या आहारात प्रोटीनचे प्रमाण कमी

आपल्या देशात प्रत्येक प्रदेशात वेगवेगळी खाद्यसंस्कृती दिसून येते; मात्र भारतीयांच्या दैनंदिन आहाराकडे बारकाईने पाहिले, तर बहुतेक लोक जेवणात भात, पोळी, बटाटा किंवा गोड पदार्थ यांसारख्या कार्बोहायड्रेट्सचा समावेश असलेल्या पदार्थांचे प्रमाण अधिक असते, तर प्रोटीनचे प्रमाण तुलनेने कमी असते. परिणामी अनेकांच्या आहारात प्रोटीनकडे दुर्लक्ष होते आणि आहाराचा समतोल बिघडतो. याचा परिणाम स्नायूंचे आरोग्य, रोगप्रतिकारशक्ती आणि एकूण आरोग्यावर होऊ शकतो. त्यामुळे भारतीयांनी आपल्या दैनंदिन आहारात पुरेशा प्रमाणात प्रोटीनचा समावेश करणे गरजेचे आहे.

भारतातील अनेक सांस्कृतिक, आहारविषयक आणि जीवनशैलीशी संबंधित कारणांमुळे प्रोटीनचे प्रमाण कमी असते.

भारतीय आहारात भात, गहू, पोळी, पराठे यांचा समावेश केला जातो. अनेकदा डाळ, कडधान्य किंवा दुग्धजन्य पदाथ यासारखे प्रोटीनयुक्त पदार्थ जेवणात कमी प्रमाणात असतात.




भारतात मोठ्या प्रमाणावर लोक शाकाहारी आहेत. शाकाहारी आहारातूनही पुरेसे प्रोटीन मिळू शकते; पण त्यासाठी डाळी, कडधान्ये, सोयाबीन, दुग्धजन्य पदार्थ, सुका मेवा आणि मिलेट्स यांचे योग्य प्रमाणात सेवन करणे गरजेचे आहे; मात्र अनेक वेळा असे केले जात नाही आणि त्यामुळे आहारातून पुरेशी प्रथिने मिळत नाहीत. डाळ, पनीर, अंडी किंवा मांसाहार यांसारखे प्रोटीनयुक्त पदार्थ मुख्य पदार्थ न मानता केवळ तोंडी लावण्याचे पदार्थ म्हणून याकडे पाहिले जाते.

**धोका ओळखा**

अनेकांना रोज किती प्रोटीन आवश्यक असते, याची माहिती नसते. भात किंवा पोळी खाल्ल्यावर पोट भरल्याने आहार संतुलित आहे असे अनेकांना वाटते. डाळी, दुग्धजन्य पदार्थ, सुका मेवा, अंडी किंवा मांस यांसारखे प्रोटीनयुक्त पदार्थ काही वेळा धान्यांच्या तुलनेत महाग वाटतात. त्यामुळे त्यांचे प्रमाण कमी ठेवले जाते. व्यस्त दिनचर्येमुळे अनेक लोक ब्रेड, स्नॅक्स किंवा पॅकेज्ड फूडवर अवलंबून राहतात. या पदार्थांत बहुतेकदा कार्बोहायड्रेटचे प्रमाण अधिक तर प्रोटीनचे प्रमाण कमी असते. प्रोटीन फक्त खेळाडू किंवा बॉडीबिल्डर्सना आवश्यक असते किंवा जास्त प्रोटीन घेतल्यास किडनीला त्रास होतो, असा गैरसमज लोकांमध्ये आढळतो. आहारात कार्बोहायड्रेट प्रमाण अधिक असणे आणि प्रोटीनची मात्रा कमी असणे हे शरीरावर नकारात्मक परिणाम करू शकतात. जास्त प्रमाणातील कार्बोहायड्रेट शरीरात ऊर्जा म्हणून वापरले गेले नाही, तर ते चरबीच्या स्वरूपात साठते. त्यामुळे व्हिसरल ओबेसिटी वाढते.

**आरोग्यचर्चा**


## स्थूलपणाकडे डोळेझाक नको



स्थूलपणा ही एक व्याधी आहे. ही समस्या मधुमेह, उच्च रक्तदाबापासून हृदयविकार, कर्करोगासारख्या दुर्धर आजारांना कारणीभूत ठरते. एवढंच नाही तर स्थूलपणा तुमच्या चव घेण्याच्या क्षमतेवरही परिणाम करू शकतो. कोणताही पदार्थ खाताना त्याची चव महत्त्वाची ठरते. म्हणूनच आपण चवीने खातो, असे म्हणतो. पण स्थूलपणा तुम्हाला चवीने खाऊ देणार नाही. कारण या समस्येमुळे तुम्हाला अन्नपदार्थांची चवच कळणार नाही. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. एका नावाजलेल्या वैद्यकीय जर्नलमध्ये हा शोध प्रकाशित झाला आहे. चव घेण्याच्या क्षमतेवर होणारा स्थूलत्वाचा परिणाम जाणून घेण्यासाठी शास्त्रज्ञांनी स्थूल उंदरांचा अभ्यास केला. त्यातून त्यांनी काही निष्कर्ष काढले आणि ही धक्कादायक बाब समोर आली.

**दंतारोग्य**


## दात घासण्याचा कंटाळा?



तुम्ही रात्री दात घासायचा कंटाळा करता का? एखाद्या दिवशी दात न घासताच न्याहरी करता का? मग ही माहिती तुमच्यासाठी धोक्याचा इशारा देणारी आहे. तोंडाच्या आरोग्याकडे, दातांच्या स्वच्छतेकडे होणारं दुर्लक्ष आपल्याला चांगलंच महागात पडू शकतं. यामुळे यकृताच्या कर्करोगाचा धोका ७५ टक्क्यांनी वाढत असल्याचं तज्ज्ञांनी स्पष्ट केलं आहे. बेलफास्टच्या क्वीन विद्यापीठात यासंबंधीचा एका अभ्यास मध्यंतरीचा केला गेला. निष्कर्षाप्रत येण्याआधी संबंधितांनी इंग्लंडमधील चार लाख ६९ हजार लोकांचा अभ्यास केला होता. त्यामुळे तोंडाच्या स्वच्छतेकडे दुर्लक्ष करणाऱ्यांनी सावध होण्याची गरज आहे, हे ओळखायला हवे.

**नेत्रारोग्य**


## मायोपियापासून दूर राहा



संगणक, स्मार्टफोन वा अशा कोणत्याही स्क्रिनकडे सतत डोळे लावून बसण्याच्या चुकीच्या सवयीमुळे अलिकडे नेत्रविकारांमध्ये वाढ होत आहे. डोळे कोरडे होणं, डोळ्यांमधून पाणी येणं, अनपेक्षितपणे चष्मा लागणं अशा समस्या वाढत आहेत. त्यातच मायोपिया या विकाराचं प्रमाणही वाढताना दिसत आहे. हा विकार झालेल्या रुग्णाला फक्त जवळचं दिसतं. एखादी वस्तू खूप जवळ आणल्याशिवाय त्याला दिसत नाही. संगणक, स्मार्टफोनचा अतिवापर मायोपियाला कारणीभूत ठरत आहे. डोळ्यांशी संबंधित व्यायामांनी मायोपियाला आळा घालता येतो. त्यामुळे तुम्हालाही हा त्रास जाणवत असेल तर नेत्रतज्ज्ञांच्या सल्ल्याने डोळ्यांचे व्यायाम करायला सुरुवात करा आणि नेत्रारोग्य जपा.

**नोंद घ्या**

## आरोग्य टिकवण्यासाठी...



पचनसंस्थेचं कार्य सुरळीत असेल तर आपलं आरोग्यही उत्तम रहातं. पचनसंस्थेचं कार्य सुधारण्यात काही नैसर्गिक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. जसे की, मेथीदाण्यांमध्ये पचनशक्ती सुधारण्याची क्षमता असते. तेव्हा पोटाला आराम देण्यासाठी थोडे मेथीदाणे तोंडात टाकून नीट चावून खा. यामुळे पचनासंबंधीच्या तक्रारी दूर होतील. सारखं पोट बिघडण्याची समस्या असणाऱ्यांनी आल्याचं नियमित सेवन करायला हवं. आल्याचा वापर वेगवेगळ्या पद्धतींनी करता येतो. आल्याचा तुकडा चघळला तरी बराच आराम मिळतो. कोरफडीच्या गरामुळेही पोटाच्या तक्रारी दूर होतात. कोरफडीमुळे शरीरातली विषद्रव्यं निघून जातात आणि पचनशक्ती बळकट होते.

# घरबांधणीत 'रॅपिकॉन' क्रांती : कमी वेळात, कमी खर्चात आणि अधिक मजबुती!



आजच्या वेगवान युगात प्रत्येक गोष्ट हाय-टेक होत असताना, बांधकामक्षेत्र तरी मागे कसे राहील? अहिल्यानगर सारख्या विस्तारणाऱ्या शहरात जिथे घरांच्या किमती आणि मजुरीचे दर वाढत आहेत, तिथे 'रॅपिकॉनवॉल' हे तंत्रज्ञान सर्वसामान्य नगरकरांसाठी एक वरदान ठरत आहे. पारंपारिक विटांच्या भिंतीला हा एक आधुनिक आणि सक्षम पर्याय आहे.

**१. रॅपिकॉनवॉल म्हणजे नक्की काय?** (What is Rapicon Wall?) – रॅपिकॉनवॉल हे प्रगत 'ड्रायवॉल' तंत्रज्ञान आहे. हेरेडीमेड सँडविच पॅनेलच्या स्वरूपात असते. यामध्ये दोन कॅल्शियम सिलिकेट बोर्ड्सच्या मध्ये सिमेंट, फ्लाईश आणि विशिष्ट प्रकारचे फायबर यांचे मिश्रण भरलेले असते. हे पॅनेल्स कारखान्यात तयार होऊन थेट बांधकाम साइटवर येतात. यामुळे विटा, वाळू आणि सिमेंटच्या मिश्रणाची कटकट उरत नाही.

**२. बांधकामाचा वेग : महिनाभराचे कामअवघ्या काही दिवसात –**

पारंपारिक पद्धतीने विटांची भिंत बांधणे, ती वाळू देणे आणि नंतर प्लास्टर करणे यात खूप वेळ जातो. मात्र, रॅपिकॉनपॅनेल्स 'टंग अँड ग्रूव्ह' (Tongue and Groove) पद्धतीने एकमेकांत सहज जोडले जातात. यामुळे भिंत उभी करण्याचा वेग पारंपारिक पद्धती पेक्षा ४ पट अधिक असतो. जर तुम्हाला तुमचे घर किंवा ऑफिसचे काम झटपट पूर्ण करायचे असेल, तर रॅपिकॉनला पर्याय नाही.

३. जागा वाचवा, पैसा वाचवा! (Space and Cost Efficiency) – विटांची भिंत साधारण ९ इंची असते, तर रॅपिकॉन भिंत फक्त२ ते ३ इंची जाडीची असूनही तितकीच मजबूत असते. यामुळे घराच्या कार्पेट एरियामध्ये (राहण्या योग्य जागा) वाढ होते. साधारणपणे १०० चौरसफूट जागेत ३ ते ५ चौरसफूट जास्तीची जागा मिळते. तसेच, या भिंतींना प्लास्टरची गरज नसल्याने लेबर खर्च आणि सिमेंट-वाळूचा खर्च मोठ्या प्रमाणात वाचतो.

४. उष्णता आणि आवाजापासून संरक्षण (Thermal and Sound Insulation) – नगरच्या उन्हाळ्यात घर थंड ठेवणे हे एक आव्हान असते. रॅपिकॉनवॉल्समध्ये उत्कृष्ट 'थर्मलइन्सुलेशन' असते, ज्यामुळे बाहेरील उष्णता घरात लवकर शिरत नाही. परिणामी, उन्हाळ्यात घर थंड राहते आणि एसीचे बिलही कमी येते. तसेच, हे पॅनेल्स 'साऊंडप्रूफ' असल्याने घराबाहेरील गोंगाट आत येत नाही, ज्यामुळे तुम्हाला शांतता लाभते.

५. पाणी आणि आगीपासून सुरक्षितता (Fire and Water Resistant) – अनेकांना वाटते की हे पॅनेल्स हलके असल्याने पाणी झिरपेल किंवा आगीचा धोका असेल. पण हे पूर्णपणे चुकीचे आहे. रॅपिकॉनवॉल्स पूर्णपणे फायर-रेसिस्टंट (आगीला रोखणारे) असतात. तसेच, या भिंतींवर पाणी मारले तरी त्या फुगत नाहीत किंवा खराब होत नाहीत. दमट हवामानातही या भिंतींना वाळवी किंवा बुरशी लागत नाही.

**६. पर्यावरणपूरक बांधकाम** (Eco-Friendly Construction) – आजच्या काळात पर्यावरणाचे रक्षण करणे गरजेचे आहे. विटांच्या भट्ट्यांसाठी मोठ्या प्रमाणात सुपीक माती वापरली जाते आणि प्रदूषण होते. याउलट, रॅपिकॉनपॅनेल्समध्ये 'फ्लाईश' (राख) वापरली जाते, जी कचरा म्हणून गणली जाते. तसेच, या बांधकामात पाणी खूप कमी लागते (Curing ची गरज नसते), त्यामुळे हे खऱ्या अर्थाने 'ग्रीनकन्स्ट्रक्शन' आहे.

**७. आमची सेवा आणि या क्षेत्रातील प्रगती** (Professional Expertise) – आम्ही गेल्या अनेक वर्षांपासून अहिल्यानगरमध्ये रॅपिकॉनवॉल तंत्रज्ञान पोहोचवत आहोत. आम्ही अनेक कमर्शियल कॉम्प्लेक्स, हॉस्पिटल्स आणि रेसिडेन्शिअल प्रोजेक्टस् मध्ये हे तंत्रज्ञान यशस्वीरित्या राबवले आहे. केवळ स्वस्त नाही, तर तांत्रिकदृष्ट्या परिपूर्ण काम देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे. नगरकरांचा आमच्यावर असलेला विश्वास हीच आमची मोठी उपलब्धी आहे.

**नगरकरांसाठी विशेष संदेश** – नगर शहर आता स्मार्टसिटीकडे वाटचाल करत आहे. बदलत्या काळानुसार आपणही आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार करायला हवा. रॅपिकॉनवॉलसारखी तंत्रज्ञाने केवळ तुमचा पैसा वाचवत नाहीत, तर नैसर्गिक संसाधनांचीही बचत करतात. मजबूत देखणे आणि पर्यावरणपूरक घर बांधून आपल्या शहराच्या शाश्वत विकासात हातभार लावा.



लेखक : **इंजि. रोहित आर. गोसावी**
शैक्षणिक अर्हता : बी.ई. (मेकॅनिकल), पी.जी. डिप्लोमा (कन्स्ट्रक्शन मॅनेजमेंट), एम.बी.ए. (प्रोजेक्ट मॅनेजमेंट), पी.जी. डिप्लोमा (वास्तूशास्त्र) ऑफीस : रॅपिकॉन बिल्डिंग सोल्युशन्स, अहिल्यानगर, महाराष्ट्र.
९४२३४३८३४३ / ७८७५६५५५५६
मेल आयडी : rapiconbuildingsolutions@gmail.com

Architects, Engineers & Surveyors Association Ahilyanagar

# जेऊर शिवारात सोलर कंपनीच्या केबलची चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांच्या टोळीला शेंडी बायपास रोडवर पकडले

## ९ लाख ९१ हजारांचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

नगर – नगर तालुक्यातील जेऊर शिवारात घुरुडी डोंगरावर असलेल्या अवादा कंपनीच्या सोलर प्रकल्पातून २ लाख रुपये किंमतीची कॉपर केबल चोरून नेणाऱ्या रेकॉर्ड वरील सराईत गुन्हेगारांच्या टोळीला स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने शेंडी बायपास रोडवर सापळा लावून पकडले आहे. या टोळीकडून चोरीचे ३ गुन्हे उघडकीस आले असून पोलिसांनी त्यांच्या कडून ९ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत केला आहे.



जेऊर शिवारात सोलर प्रकल्पातून २ लाख रुपये किंमतीची कॉपर केबल चोरणाऱ्या टोळीला पकडल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

संतोष अशोक जाधव (वय २८, रा. हायस्कुल जवळ प्रवरासंगम, ता.नेवासा), करण वैश्य भोसले (वय २०, रा. भेंडाळा ता.गंगापुर जि. अहिल्यानगर), मनोज सुनिल लिंभोरे (वय २३, रा. कहारगल्ली, प्रवरासंगम, ता.नेवासा), परमेश्वर वैश्य भोसले (वय ३९, रा. भेंडाळा, ता. गंगापुर, जि.छत्रपती संभाजीनगर) अशी पकडलेल्या आरोपींची नावे आहेत. या सोलर प्रकल्पातून १८ मार्च च्या रात्री कॉपर केबल चोरीला गेली होती. याबाबत १९ मार्च रोजी एमआयडीसी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. किरणकुमार कबाडी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक अनंत सालगुडे, संदिप मुरकुटे, पोलीस अंमलदार विष्णु भागवत, अतुल लोटके, फुरकान शेख, रिचर्ड गायकवाड, भगवान थोरात, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक अरुण मोरे यांचे पथक करत होते.

सदर पथक तपास करत असताना सदरचा गुन्हा हा रेकार्डवरील आरोपी संतोष अशोक जाधव याने त्याचे साथीदारासह केला असुन तो शेंडी बायपास रोडने पांढऱ्या रंगाच्या पिकअप व मोटार सायकलवर तांबे धातुची ताराची विक्री करण्यासाठी नगरच्या दिशेने येणार असल्याची गोपनीय माहिती मिळाली. त्यानंतर पथकाने तात्काळ शेंडी बायपास रोडलगत किनारा हॉटेलजवळ सापळा रचुन थांबले असता शेंडीकडुन दुध डेअरी चौकाकडे एक संशयित पिकअप व मोटार सायकल येतांना दिसुन आले. पथकाने सदर दोन्ही वाहने थांबवुन चौघांना ताब्यात घेतले. त्यांच्या कडून २०० किलो तांब्याचे धातुचे तारा, एक महिंद्रा पिकअप, एक मोटार सायकल, एक कटर व एक स्क्रु ड्रायव्हर, वेगवेगळ्या कंपनीचे ४ मोबाईल असा एकुण ९ लाख ९१ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. सर्व आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्यावर यापूर्वी विविध पोलिस ठाण्यात गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत.

# शांती प्रस्थापित करण्यासाठी येशू ख्रिस्तांचा 'दया, क्षमा व अहिंसे'चा संदेश अत्यावश्यक

## उत्तम शुक्रवारी अहमदनगर पहिली मंडळी सीएनआय चर्चमध्ये विशेष उपासना

नगर – उत्तम शुक्रवार या ख्रिस्ती धर्मातील अत्यंत पवित्र दिवसाचे स्मरण ठेवत अहमदनगर पहिली मंडळी सीएनआय चर्चमध्ये विशेष उपासना श्रद्धा व भक्तीभावात झाली. प्रभू येशू ख्रिस्ताने अखिल मानवजातीच्या उद्धारासाठी जगाचे पाप स्वतः वर घेत वधस्तंभावर दिलेल्या बलिदानाची आठवण ठेवत ख्रिस्ती बांधव या उपासनेत सहभागी झाले होते.



उत्तम शुक्रवारी अहमदनगर पहिली मंडळी सीएनआय चर्चमध्ये पुणे येथील इमॅन्युएल चर्चचे प्रिस्ट इन चार्ज रेव्ह. विजय म्हंकाळे यांनी प्रभू येशू ख्रिस्ताने वधस्तंभावरील मरणापूर्वी उच्चारलेल्या सात शब्दांचे सखोल विवेचन केले.

या प्रसंगी पुणे येथील इमॅन्युएल चर्चचे प्रिस्ट इन चार्ज रेव्ह. विजय म्हंकाळे यांनी प्रभू येशू ख्रिस्ताने वधस्तंभावरील मरणापूर्वी उच्चारलेल्या सात शब्दांचे सखोल विवेचन केले. त्यांनी सांगितले की, कोणताही अपराध नसताना येशू ख्रिस्तांना क्रुसावर खिळले गेले, तरीही त्यांनी हे पित्या, यांना क्षमा कर अशी प्रार्थना करत क्षमाशीलतेचा सर्वोच्च आदर्श जगासमोर ठेवला.

आजच्या अशांत आणि तणावपूर्ण जगात शांती प्रस्थापित करायची असेल, तर येशू ख्रिस्तांचा दया, क्षमा आणि अहिंसेचा संदेश प्रत्येकाने आपल्या जीवनात अंगीकारणे अत्यंत गरजेचे आहे, असे मार्गदर्शन रेव्ह. म्हंकाळे यांनी केले.

या उपासनेचे संचलन रेव्ह. डिकन नूतन कांबळे यांनी केले.

# महावीर इंटरनॅशनलच्या अध्यक्षपदी राजेंद्र बोथरा व वर्षा बाफना यांची निवड

नगर – महावीर इंटरनॅशनल संस्थेच्या अहिल्यानगर केंद्राच्या अध्यक्षपदी राजेंद्र बोथरा व महिला विभागाच्या अध्यक्षपदी वर्षा नरेंद्र बाफना यांची निवड करण्यात आली आहे. याच बरोबर सेक्रेटरीपदी वसंत बोरा, खजिनदारपदी गौतम पारख, तसेच महिला विभागाच्या सेक्रेटरीपदी अपर्णा बोथरा, खजिनदारपदी उल्का पारख, सतीश चोपड़ा, सरला बरमेचा, नीलेश बोथरा, अक्षय बाफना आदींचीही निवड झाली आहे. या नूतन पदाधिकाऱ्यांना



सभागीय अध्यक्ष विकास पाटणी यांनी शपथ देऊन पदभार दिला.

राजेंद्र बोथरा हे गेल्या अनेक वर्षांपासून सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक अशा विविध क्षेत्रात काम करत आहे. महावीर इंटरनॅशनलच्या सर्व उपक्रमांमध्ये सक्रीय सहभाग घेतला आहे. जैन कॉन्फरन्सचे प्रांतीय कोषाध्यक्षपदही राजेंद्र बोथरा यांनी काम केले आहे.

महिला विभागाच्या अध्यक्षा वर्षा बाफना या उद्योजिका असून बाफना ग्रुपच्या संचालिका आहेत. महावीर इंटरनॅशनलच्या माध्यमातून विविध सामाजिक उपक्रमांद्वारे गरजू महिलांना मदत केली आहे. कोषाध्यक्षपदी ही त्यांनी चांगले काम केले. येणाऱ्या काळात अधिक उपक्रम राबवण्यावर भर देणार असल्याचे वर्षा बाफना यांनी सांगितले.

# किराणा दुकानात घुसून पिता-पुत्राला बेदम मारहाण


नगर – भिंगार कॅम्प पोलीस ठाण्याच्या हद्दीतील नागरदेवळे परिसरात एका तरुणाने किरकोळ कारणावरून किराणा दुकानदारासह त्यांच्या मुलाला लाकडी दांडके आणि फायटरने बेदम मारहाण केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी वैभव देविदास हजारे (रा. नागरदेवळे, ता.नगर) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नागरदेवळे येथील रहिवासी रोहीदास लक्ष्मण हराळे यांचे स्वतःच्या घराशेजारीच किराणा दुकान आहे. ३१ मार्च रोजी रात्री अकरा वाजेच्या सुमारास हराळे हे दुकानात असताना आरोपी वैभव हजारे त्या ठिकाणी आला. कोणतीही पूर्वकल्पना नसताना आरोपीने हातातील लाकडी दांडके आणि फायटर या घातक हत्याराचा वापर करून रोहीदास हराळे यांच्यावर हल्ला चढवला. मध्यस्थी करण्यासाठी आलेला त्यांचा मुलगा बाळू हराळे यालाही आरोपीने बेदम मारहाण केली.

या हल्ल्यात दोघेही गंभीर जखमी झाले असून, त्यांना उपचारासाठी शहरातील खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. आरोपीने मारहाण केल्यानंतर अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी देऊन घटनास्थळावरून पळ काढला. याबाबत हराळे यांच्या फिर्यादीवरून भिंगार कॅम्प पोलिसांनी गुन्हा नोंदवला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार झरेकर करत आहेत.

# सुरेगावच्या दावलमलिक बाबांचा ७ एप्रिलला यात्रोत्सवाचे आयोजन

नगर – जिल्ह्यातील श्रीगोंदा तालुक्यातील सुरेगाव येथील हिंदू-मुस्लीम बांधवांचे श्रद्धास्थान असलेल्या ग्रामदैवत दावलमलिक बाबाचा यात्रा उत्सवाचे ७ एप्रिल रोजी आयोजन करण्यात आलेले आहे. यात्रेच्या आदल्या दिवशी सोमवारी रात्री संदल मिरवणूक काढण्यात येणार आहे. या वर्षी



मनोरंजनासाठी ऑर्केस्ट्रा कार्यक्रम न होता त्याची जमा झालेली रक्कम गावातील भैरवनाथ मंदिरास दिली जाईल. यानिमित्ताने दर्गाह परिसरात आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे अशी माहिती यात्रा कमिटीच्या वतीने देण्यात आली आहे, अशी माहिती महावीर पोखरणा यांनी दिली.



श्री सांदिपनी अकॅडमी कडून अहिल्यानगर येथील पोलीस वीरांचा सन्मान करण्यात आला. याप्रसंगी उपस्थित असलेले पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे, उपमहापौर अॅड. धनंजय जाधव आदी.

# नगरच्या श्री सांदिपनी अकॅडमीकडून पोलीस वीरांचा सन्मान म्हणजे आदर आणि कृतज्ञतेची नवी संस्कृती : पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

नगर – पोलीस दल समाजाच्या सुरक्षेसाठी अत्यंत निष्ठेने आणि धाडसाने कार्य करत आहे. अशा प्रकारचा 'पोलीस शौर्य सन्मान २०२६' हा उपक्रम पोलीस कर्मचाऱ्यांच्या कार्याला योग्य ती दाद देणारा असून, त्यांच्या मनोबलात निश्चितच वाढ करणारा आहे. पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे

समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदारांच्या धाडस, कर्तव्यनिष्ठा आणि उल्लेखनीय कार्याचा गौरव करण्यासाठी पोलीस शौर्य सन्मान २०२६ हा सोहळा श्री सांदिपनी अॅकॅडमी व ९२.७ बिग एफ एम यांच्या संयुक्त विद्यमाने संजोग लॉन्स येथे पार पडला. या उपक्रमामागे श्री सांदिपानी अॅकॅडमीचे संचालक के. बालराजु कर्री यांचा प्रेरणादायी पुढाकार होता.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. यावेळी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आमदार संग्राम जगताप, उपमहापौर धनंजय जाधव, बालराजु कर्री, कडूभाऊ काळे, ग्रुप हेड धनेश खत्ती, आरजे गायत्री, रोहन राठोड, प्रसाद बेडेकर आदी उपस्थित होते.

या सोहळ्यात विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना पोलीस शौर्य सन्मान २०२६ प्रदान करून गौरविण्यात आले.

गंभीर गुन्ह्यांमधील आरोपींना अटक करून कायदा व सुव्यवस्था राखण्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल पोलीस निरीक्षक किरण कुमार दशरथ कबाडी तसेच सहाय्यक पोलीस निरीक्षक हरीश शंकर भोये यांचा सन्मान करण्यात आला.

धाडसी कारवाया करून गुन्हेगारांवर प्रभावी कारवाई केल्याबद्दल पोलीस हेड कॉन्स्टेबल दीपक भास्कर घाटकर तसेच कायद्यांतर्गत प्रभावी प्रस्ताव सादर करून गुन्हेगारीविरोधात लढा उभारल्याबद्दल सहाय्यक फौजदार रवींद्र सुरेश पांडे यांना गौरविण्यात आले.

सायबर गुन्हेगारीविरोधात डिजिटल अरेस्ट सारख्या फसवणुकींचा पर्दाफाश करून उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल पोलीस निरीक्षक मोरेश्वर पेंदाम, पोलीस निरीक्षक सागर ढिकले, पोलीस उपनिरीक्षक सुदाम काकडे, पोलीस उपनिरीक्षक योगेश चाहेर, सहाय्यक फौजदार योगेश गोसावी, पोलीस नाईक अभिजित अर्कल या सायबर पथकाचा सन्मान करण्यात आला.

निर्दयी खून प्रकरणाचा छडा लावून आरोपींना अटक करण्यात यश मिळवल्याबद्दल पोलीस निरीक्षक संतोष मुटकुळे, पोलीस सहाय्यक निरीक्षक प्रवीण महाले, पोलीस हेड कॉन्स्टेबल चंद्रकांत कुसारे, पोलीस कॉन्स्टेबल ईश्वर गर्जे, पोलीस कॉन्स्टेबल श्याम गुंजाळ, पोलीस कॉन्स्टेबल एकनाथ गर्कळ यांचा गौरव करण्यात आला.

मानवी तस्करी प्रतिबंध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पोलीस निरीक्षक रवींद्र देशमुख, सहायक फौजदार शकील शेख, पोलीस हेड कॉन्स्टेबल समीर सय्यद, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल अर्चना काळे, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिता पवार, महिला पोलीस कॉन्स्टेबल छाया रांधवन, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल भाग्यश्री भिटे, महिला पोलीस कॉन्स्टेबल ज्योती शिंदे यांना सन्मानित करण्यात आले.

महिला सुरक्षा व जनजागृती उपक्रमांत उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल पोलीस सहाय्यक निरीक्षक प्रियांका आठरे, पोलीस नाईक प्रियांका पवार, पोलीस नाईक मैना माळी यांचा गौरव करण्यात आला.

वाहतूक व्यवस्थापनात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल सहाय्यक फौजदार रामराव शिरसाठ व सहाय्यक फौजदार रियाज इनामदार यांना सन्मानित करण्यात आले.

तांत्रिक तपासाद्वारे अनेक गुन्ह्यांचा उलगडा केल्याबद्दल सहाय्यक पोलीस निरीक्षक गणेश वडणगेकर, पोलीस हवालदार संतोष साबळे, पोलीस हवालदार रविंद्र गायकवाड, महिला पोलीस हवालदार जनाबाई कदम, पोलीस हवालदार शाहिन पठाण यांचा गौरव करण्यात आला.

डायल ११२ सेवेत तत्पर प्रतिसाद दिल्याबद्दल पोलीस सहाय्यक निरीक्षक अख्तर पठाण व महिला पोलीस कॉन्स्टेबल प्रज्ञा डोंगरे यांना सन्मानित करण्यात आले.

ई-साक्ष व तांत्रिक सहाय्य क्षेत्रात उत्कृष्ट योगदान दिल्याबद्दल महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल रोहिणी जाधव, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल सविता मुटकुळे, महिला पोलीस कॉन्स्टेबल ताई दराडे यांचा गौरव करण्यात आला.

प्रशासन व चारित्र्य पडताळणी कार्यात उल्लेखनीय योगदान दिल्याबद्दल पोलीस निरीक्षक धनंजय जाधव, सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण गवंड, पोलीस कॉन्स्टेबल अमोल राऊत, महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल अनिता विधाटे यांना सन्मानित करण्यात आले.

रात्रगस्ती दरम्यान धाडसी कारवाई करून गंभीर गुन्हा रोखल्याबद्दल पोलीस हेड कॉन्स्टेबल शहाजी आंधळे, पोलीस कॉन्स्टेबल वाल्मिक वाघ, पोलीस कॉन्स्टेबल संतोष खंडागळे यांचा सन्मान करण्यात आला.

कर्तव्यनिष्ठ व उत्कृष्ट कार्याबद्दल महिला पोलीस हेड कॉन्स्टेबल मोनिका सचिन पवार यांना विशेष सन्मान देण्यात आला.

यावेळी के. बालराजु करी यांनी सांगितले की, पोलीस दल हे समाजाच्या सुरक्षिततेचे आधारस्तंभ आहेत. 'पोलीस शौर्य सन्मान २०२६' हा त्यांच्या कार्याला सलाम करण्याचा एक छोटासा प्रयत्न आहे.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव म्हणाले की, समाजात कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीसांचे योगदान अतुलनीय आहे. हा उपक्रम अत्यंत स्तुत्य असून, पोलीस दलाचा सन्मान करण्याची ही परंपरा पुढेही कायम राहावी. या सोहळ्यामुळे पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचा उत्साह वाढणार असून समाजात सुरक्षिततेची भावना अधिक बळकट होणार आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

